रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक १४७
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, १४ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## राज्यात २३ हजार ६२८ पोलिसांची होणार भरती



**नागपूर** : राज्यात लवकरच २३ हजार ६२८ पोलीस शिपायांची पदभरती होणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत लक्षेवेधीवेळी दिली. गृह विभागातील पोलीस शिपाई भरती तातडीने करण्याबाबत लक्षवेधी सूचना आमदार सतेज पाटील यांनी मांडली होती. यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. त्यांनी राज्यात २३ हजारांपेक्षा जास्त पोलिसांची लवकरच भरती होणार असल्याचे सांगितले. गृह विभागातील १९७६पासून आकृतीबंधनुसार पदभरती केली जात होती. आता लोकसंख्येनुसार किती अंतरावर पोलीस स्टेशन, कर्मचारी, युनिट असले पाहिजे याबाबत नवीन आकृतीबंध तयार करण्यात आले आहे. त्या अंतर्गत २३ हजार ६२८ पोलीस शिपाई पदे भरली जाणार असल्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.

अंतरंग
नवी मुंबईत ८१ टक्के बालकांचे पोलिओ लसीकरण/२
जांबरुंग धरणाचे काम सुरू; 'रामप्रहर'च्या वृत्ताची दखल/५
नवी मुंबईत आज भारत वि. इंग्लंड महिला कसोटी सामना/८

# ओबीसींसाठी ३,३७७ कोटींची विक्रमी तरतूद

## राज्य सरकारकडून निधीला मंजुरी

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्याच्या हिवाळी अधिवेशनात ओबीसी विभागासाठी प्रथमच ३,३७७ कोटींची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. नागपूर येथे सुरू असलेल्या अधिवेशात बुधवारी (दि. १३) हा निधी देण्यात आला.

या मंजुरीनंतर ओबीसी विभागाचे २०२३-२४च्या योजनांसाठी तरतूद ७,८७३ कोटी इतकी झाली आहे. ओबीसी विभाग स्थापन झाल्यानंतर एका वर्षांसाठी झालेली ही विक्रमी



तरतूद आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ३०८१ कोटी अधिक आहेत. या निधी अंर्तगत शिक्षण, निवारासारख्या विविध योजना राबविल्या जाणार आहेत. यामुळे ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी प्रवर्गातील लाभार्थ्यांना शैक्षणिक आणि सामुहिक विकासकामांसाठी हातभार लागेल, असा विश्वास मंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केला.

या निधीतून पंतप्रधान मोदी आवास योजनेसाठी एक हजार कोटींची तरतूद आहे. यासोबत महाज्योती योजनेसाठी २६९ कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेसाठी १५८ कोटी, धनगर समाजाच्या योजनांसाठी ५६ कोटी, अमृत संस्थेसाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

यासोबतच ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी ११९२ कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे, तसेच राज्य मागासवर्ग आयोग ३६० कोटी, ओबीसी आणि व्हीजेएनटी महामंडळासाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# लोकसभेच्या सभागृहात दोन तरुणांची घुसखोरी

## चौघांना अटक; लातूरच्या एकाचा समावेश



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू असताना लोकसभेत बुधवारी (दि. १३) शून्य प्रहारात खासदार त्यांचे म्हणणे मांडत असताना प्रेक्षक गॅलरीतून दोन तरुणांनी अचानक सभागृहात घुसखोरी करीत उड्या मारल्या. दोघेही खासदारांच्या बाकावरून लोकसभा अध्यक्षांच्या खुर्चीच्या दिशेने धावत होते. याचवेळी त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या स्मोक कॅनमधून पिवळ्या रंगाचा धूर सोडला. यामुळे सभागृहात एकच गदारोळ झाला. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत चौघांना ताब्यात घेतले आहे. पिठासीन अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल यांनी लोकसभा २ वाजेपर्यंत स्थगित केले होते.

संसदेत राडा करणारे दोन जण आणि संसदेबाहेर घोषणा देणारे दोन (एका महिलेसह) असे मिळून चार जण सध्या पोलिसांच्या ताब्यात आहेत. संसदेत राडा करणाऱ्या दोन तरुणांची नावे सागर शर्मा आणि डी. मनोरंजन (३५) अशी आहेत, तर संसदेबाहेर नीलम कौर (४२) आणि अमोल शिंदे (२५) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. संसदेबाहेर नीलम आणि अमोल शिंदे या दोघांनी तानाशाही नही चलेगी, मणिपूरवासियांना न्याय द्या, महिलांवरील अत्याचार सहन करणार नाही, भारत माता की जय, हुकुमशाही बंद करा, जय भीम, जय भारत, वंदे मातरम् अशा घोषणा दिल्या होत्या.

नीलम कौर ही हरियाणामधील जींद जिल्ह्यातील घासो गावातली रहिवासी आहे. तिच्या वडिलांचे मिठाईचे दुकान आहे. पीटीआने म्हटले आहे की, अमोल शिंदे हा महाराष्ट्रातल्या लातूर जिल्ह्यातील रहिवासी आहे. नीलम आणि अमोल हे दोघे संसदेबाहेर घोषणा देत होते, तर डी. मनोरंजन हा कर्नाटकचा रहिवासी असून तो ऑटोरिक्षा चालवण्याचं काम करतो. या चौघांचा म्होरक्या असलेला सागर शर्मा हा उत्तर प्रदेशची राजधानी लखनौचा रहिवासी आहे. या चोघांनी काही दिवसांपूर्वी या हल्ल्याचा कट रचला होता.

या घटनेप्रकरणी चौघांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. खासदार आणि सुरक्षा अधिकाऱ्यांनी सागर आणि मनोरंजन यांना चोप दिला आहे. हा प्रकार त्यांनी कोणत्या उद्देशाने केला याची चौकशी केली जाईल. या घोषणाबाजीत मणिपूरचा उल्लेख असल्याने त्या दृष्टीनेही चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. दिल्ली पोलीस आयुक्त संजय अरोरा हेसुद्धा घटनेनंतर संसदेत दाखल झाले होते. ते स्वतः याप्रकरणी चौकशी करीत असल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकारणानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीही, आजपासून प्रत्येक आमदाराला जास्तीत जास्त दोन पासेस दिले जातील. त्याव्यतिरिक्त तिसरा पास दिला जाणार नाही, असे विधानसभेत जाहीर केले.

## ३१ रक्तपेढ्यांमध्ये ॲलिकॉट मशीन बसविणार -मंत्री डॉ. तानाजी सावंत

**नागपूर : प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व ३१ रक्तपेढ्यांमध्ये ॲलिकॉट मशीन (रक्ताच्या लहान पिशव्या तयार करणारे यंत्र) येत्या महिन्याभरात बसवण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी विधानसभेत दिली. याशिवाय खासगी रक्तपेढ्यांनाही ॲलिकॉट मशीन बसविण्याची सक्ती करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सभागृहात सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री प्रा. डॉ. सावंत म्हणाले की, रक्ताशी संबंधित विविध आजार असलेल्या लहान



मुलांमध्ये प्रौढ रुग्णांइतकी रक्तांची गरज लागत नसल्यामुळे रक्त वाया जाऊ नये, यासाठी रक्तपेढ्यांमध्ये ॲलिकॉट मशीन उपलब्ध असणे गरजेचे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या ३१ रक्तपेढ्यांपैकी सध्या केवळ आठ रक्तपेढ्यांध्ये तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील १४ रुग्णालयांपैकी केवळ तीन ठिकाणी ॲलिकॉट मशीन ही सुविधा उपलब्ध आहे.

ॲलिकॉट मशीन हे लहान यंत्र असून रक्ताची ३५० मिलीची पूर्ण बॅग गरजेप्रमाणे विभाजन करून बालरुग्णांना अचूक तेवढेच रक्त देण्यासाठी या मशीनचा उपयोग होतो.

### आरोग्य पदभरती प्रक्रिया लवकरच

सार्वजनिक आरोग्य विभागात आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठीची पदभरती प्रक्रिया येत्या महिन्याभरात पूर्ण होईल, अशी माहितीही या वेळी मंत्री प्रा. डॉ. सावंत यांनी दिली.

## महिलांच्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी अतिरिक्त मुख्य सचिवांची समिती

**नागपूर** : गडचिरोली आणि बुलढाणा येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील प्रसुतीदरम्यान झालेल्या महिलांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आरोग्य विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल. या समितीचा चौकशी अहवाल १५ दिवसात मागवून दोषींवर कारवाई केली जाईल, असे आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

त्याचप्रमाणे आदिवासी समाजातील महिलांच्या आरोग्य सुविधेसाठी गडचिरोलीत २०० खाटांचे स्त्री रुग्णालय सुरू करण्याची घोषणा आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांनी सभागृहात केली.

ते म्हणाले की, गडचिरोली येथील घटनेप्रकरणी गठित करण्यात आलेल्या विभागीय चौकशी समितीच्या अहवालानुसार, महिलेचा मृत्यू जंतुसंसर्गामुळे झाल्याचे दिसून येते. यात डॉक्टर व कर्मचारी दोषी आढळल्याचे चौकशी अहवालात दिसून येत नाही. मातेची स्थिती गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी नेत असताना प्रवासादरम्यान तिचा मृत्यू झाला. उपसंचालक आणि वैद्यकीय अधिष्ठाता, अकोला यांच्या अहवालानुसार मातेस योग्य ते उपचार दिल्याचे त्यांनी उत्तरात स्पष्ट केले.

## निवडक

### भारतीय जवानांना मिळणार सिग सॉर रायफल्स

**नवी दिल्ली** : भारतीय लष्कराचे सामर्थ्य वाढवण्यासाठी भारत सरकारने मोठी तयारी केली आहे. भारतीय लष्कराला ७०,०००हून अधिक सिग सॉर असॉल्ट रायफल्स खरेदी करण्यास मंजुरी मिळाली आहे. दरम्यान भारताचा चीनसोबत लष्करी संघर्ष आणि पाकिस्तान जम्मू-काश्मीरजवळील नियंत्रण रेषेजवळ दहशतवादी कारवाया होत असताना ही मंजुरी मिळाली आहे.

### जेजुरी गडावर खंडोबाचा नवरात्रोत्सव उत्साहात सुरू

**पुणे** : महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणून प्रसिद्ध असलेल्या जेजुरीच्या खंडोबा गडावर बुधवारी (दि. १३) करवीर पिठाचे शंकराचार्य नृसिंह भारती यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा ते चंपाषष्टीपर्यंत खंडोबाचा हा नवरात्रोत्सव सहा दिवसांचा असून या वेळी लाखो भाविक गडावर येतात.

## महाडमध्ये गॅस सिलिंडरचा पाईप पेटला

### तीन भावंडे गंभीर जखमी



**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील पारवाडी या गावात गॅस सिलेंडरचा पाईप पेटला असता या आगीत प्रथम घरातील मोठ्या बहिणीचे कपडे पेटल्याने तिला वाचविण्यासाठी गेलेला तिचा भाऊ आणि लहान बहीणदेखील भाजून गंभीर जखमी झाले. ही घटना मंगळवारी (दि. १२) रात्री रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली.

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, पारवाडी गावातील प्रज्ञा प्रकाश आमले (वय २६) हिने मंगळवारी रात्री जेवण बनविण्यासाठी गॅस पेटविला असता या गॅस सिलिंडरचा पाईप लिक होऊन पाईपने पेट घेतला. या प्रचंड ज्वालांनी प्रज्ञाच्या अंगावरील कपड्यांनी पेट घेतला. तिला वाचविण्यासाठी धावलेला तिचा भाऊ रुपेश प्रकाश आमले (वय २४) याच्या कपड्यांनीदेखील पेट घेतला. आपली दोन्ही भावंडे जळताना पाहून घाबरलेल्या प्रिती प्रकाश आमले (वय २१) हीदेखील त्यांना वाचवण्यासाठी धावली असता तीदेखील भाजून गंभीर जखमी झाली.

तिघांनाही तत्काळ न्यू लाईफ हॉस्पिटल महाड येथे उपचारासाठी दाखल केले, मात्र ५० टक्के भाजलेल्या प्रज्ञा व रुपेश यांना पुढील उपचारासाठी जे. जे. हॉस्पिटल मुंबई येथे हलविण्यात आले. महाडमधून या दोन्ही भावंडांना १०८ रुग्णवाहिकेने मुंबई येथे नेण्यात आले. या वेळी रुग्णवाहिकेतील डॉ. नागरे यांनी सहकार्य केले.

## ज्येष्ठ अभिनेते रवींद्र बेर्डे यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**



मराठी सिनेसृष्टीमधील ज्येष्ठ अभिनेते रवींद्र बेर्डे यांचे बुधवारी (दि. १३) निधन झाले. वयाच्या ७८व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

रवींद्र बेर्डे यांना काही वर्षांपूर्वी घशाचा कर्करोग झाला होता. त्यांच्यावर टाटा रुग्णालयात उपचारही सुरू होते. श्वास घेण्यास त्रास होत असल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. उपचारानंतर दोन दिवसांपूर्वीच त्यांना घरीदेखील सोडले. सर्व काही सुरळीत चालू असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे.

रवींद्र बेर्डे मराठी चित्रपट सृष्टीचा बादशहा लक्ष्मीकांत बेर्डे यांचे सख्खे भाऊ होते. त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम करून प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केले होते.

## केंद्रीय पथकाची दुष्काळग्रस्त भागात पाहणी

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळाच्या पाहणीसाठी केंद्राची दोन पथके बुधवारी (दि. १३) मराठवाड्याच्या दौऱ्यावर आली होती. छत्रपती संभाजीनगरमधील सोयगाव तालुक्यातल्या धनवट गावात या पथकाने नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. पाण्याअभावी पीके कोमेजून गेली, यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तत्काळ मदत करण्याची मागणी केली.

मराठवाड्यात यंदा अपेक्षित पाऊस झाला नसल्याने अनेक भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. केंद्र आणि राज्य सरकाराने शेतकऱ्यांना



नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्राचे पथक मराठवाड्यासह राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात पाहणी दौरा करीत आहे.

छत्रपती संभाजीनगरच्या अनेक गावात जाऊन या पथकाने पाहणी केली. शेतकऱ्यांसोबत संवाद साधत शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नाचणी, कपाशी, मका यांसह अनेक पिकांचा आढावा त्यांच्याकडून घेण्यात आला.

छत्रपती संभाजीनगरप्रमाणेच केंद्राचे पथक धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळ पाहणीसाठी शेतकऱ्याच्या बांधावर दाखल झाले. तीन सदस्यीय पथक जिल्ह्याचा मॅरेथॉन दौरा करून ११ गावांना भेट देणार आहे. पिकांची परिस्थिती, पाण्याअभावी रखडलेली पेरणी, चारा व पाणीटंचाईचा आढावा घेऊन पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधला.

# पोलादपुरात देवदिवाळीनंतर बैलदिवाळीला सुरुवात

### दाभिळ येथे बैल नाचविण्याची परंपरा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यात देवदिवाळीनंतर दुसऱ्या दिवशी मार्गशिर्ष प्रतिपदेपासून बैलदिवाळी साजरी करण्याची परंपरा आहे. ग्रामीण तालुक्यातील देवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील दाभिळ गावात बुधवारी (दि. १३) बैलदिवाळीचे आयोजन करण्यात आले.

दिवाळीनंतर देवदिवाळी झाली की, शेतकरीराजा आणि त्याची सर्जा-राजाची बैलजोडी शेतीच्या कामातून मोकळी झालेली असते. देवदिवाळीनंतरच्या दुसऱ्या दिवशी मार्गशिर्ष प्रतिपदेपासून बैलदिवाळी साजरी करण्याची परंपरा असल्याने तालुक्यातील ग्रामीण भागात यादिवशी बैलांना सजवून शेताच्या खाचरांमधून नाचविले जाते. बैलांच्या शिंगांना झुपकेदार,



रंगीबेरंगी तुरे लावून त्याची वेसण मालकांच्या हाती दिली जाते. अनेकदा शेतकरी असूनही शेतीकामापासून दूर झालेल्या चाकरमान्यांनाही या बैलदिवाळीचे आकर्षण असल्याने अन्य गावांतून बैल आणला जातो. बैल नाचवायचा पहिला मान गावच्या फौजदाराचा असतो. शेतकरीराजा यादिवशी बैलाला स्वच्छ धुवून त्याच्यावर गुलाल उधळून सजवितो.

या वेळी कापणी-मळणी झालेल्या शेताच्या बांधावरून खाचरामध्ये बैल उतरविताना स्वतः शेतकरी असेल तर तो स्वतःकडे बैलाची वेसण धरतो. बैलाची वेसण ओढली की, तो पुढच्या पायावर झुकून उडी मारतो. या नाचणाऱ्या बैलाचे उधळणे झाले की, ग्रामस्थ त्याच्याभोवती काठ्या घेऊन फिरतात. या काठयांच्या टोकाला बकरीच्या अंगावरील केसांच्या झुपक्यांसह चामडे असते. यामुळे या बैलाला शिंकेची भावना होऊन तो मान जोरात खाली-वर करतो आणि काठी समोर आणणाऱ्यावर शिंग रोखून धरतो. बैलांची ही प्रतिक्रिया त्यांची मरगळ, अकड निघण्याचे द्योतक असते. तालुक्यातील दुर्गम भागात बैलदिवाळीचा आनंद सर्वत्र उत्साहाने घेतला जातो.

## भारताची गोपनीय माहिती पाकिस्तानला देणारा तरुण अटकेत

**ठाणे : प्रतिनिधी**

भारताची गोपनीय माहिती पाकिस्तानला पुरविल्याबद्दल महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने एका २३ वर्षांच्या तरुणाला ठाण्यातून अटक केली आहे. या तरुणाचे नाव गौरव पाटील असल्याचे एटीएसने सांगितले आहे. एएनआय या वृत्तसंस्थेने याबाबत वृत्त दिले आहे. हा तरूण नेव्हल डॉक येथे शिकाऊ उमेदवार म्हणून काम करीत आहे.

माहितीच्या बदल्यात ऑनलाईन पैसे स्विकारल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. एप्रिल ते ऑक्टोबर महिन्यांत पाकिस्तानी गुप्तहेराच्या फेसबुक आणि व्हॉट्सॲपवर तो संपर्कात होता. एटीएसने चौकशी केल्यानंतर चौघांना अटक केली आहे. गौरव पाटील याला १८ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्याला हनी ट्रॅपमध्ये अडकवल्याचा संशय आहे. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे. गौरव पाटीलशिवाय अन्य तीघांचाही पाकिस्तानचा गुप्तहेर संपर्कात होता. एटीएसने चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## अभिनंदन अन् शुभेच्छा!



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. याबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बबन साळुंखे तसेच एम. बी. शेळके, एन. जे. भोपी यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.**

## संपादकीय

# संसद सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**देशाच्या संसदेवर २००१ साली झालेल्या दहशतवादी हल्ल्याला बुधवारी १३ डिसेंबर रोजी २२ वर्षे पूर्ण होत असतानाच सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाचे वेळी दोन तरुणांनी लोकसभेच्या गॅलरीतून खाली उडी मारून सभागृहात पिवळ्या धुराचे लोट पसरवले तर अन्य दोघांनी संसदेबाहेर गोंधळ माजवला. या घटनेमुळे नव्या संसदेच्या सुरक्षेविषयी मोठी चिंता निर्माण झाली आहे.**

संसदेवरील दहशतवादी हल्ल्याचा बुधवारी स्मृतीदिन असताना त्याच दिवशी दोन तरुणांनी लोकसभेच्या सभागृहात प्रेक्षक गॅलरीतून उडी मारून पिवळ्या धुराचे लोट पसरवले. संसदेतील घुसखोरीच्या या प्रकरणात एकंदर चार जणांना अटक करण्यात आली असून घुसखोरी करणाऱ्या दोघा तरुणांपैकी एक जण महाराष्ट्रातील असल्याचे उघडकीस आले आहे. संसदेतील घुसखोरीच्या या घटनेत दोन जणांनी सभागृहात गोंधळ माजवला तर आणखी दोन जण संसदेबाहेरही गोंधळ घालत होते. या चारही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी सुरू आहे. सुरक्षा भेदून गॅलरीतून सभागृहात उड्या मारणाऱ्या दोघा तरुणांमध्ये सागर शर्मा व मनोरंजन यांचा समावेश असून त्यांनी भारतीय जनता पक्षाचे म्हैसूरचे खासदार प्रताप सिम्हा यांच्या शिफारशीवरून लोकसभेत प्रवेशाचा पास मिळवला होता. या घटनेतील महाराष्ट्रीय तरुण अमोल शिंदे हा लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील झरी येथील रहिवासी असून त्याच्या चौकशीचे आदेश गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. तो सैन्यभरतीसाठी तयारी करत होता असे समजते. या घटनेत नीलम कौर नावाच्या एका ४२ वर्षीय महिलेचाही समावेश असून ती हरयाणातील हिसार येथे राहणारी आहे. ती उच्चशिक्षित असून डाव्या विचारसरणीची असल्याचे आढळले आहे. इन्स्टाग्रामवरून एकमेकांच्या संपर्कात राहात या चार जणांनी हल्ल्याची तयारी केल्याचे समजते. या घटनेत दोन तरुणांनी प्रेक्षक गॅलरीतून लोकसभेत उड्या मारल्या आणि त्यानंतर ते बाकांवर चढून उड्या मारत पुढे जाऊ लागले. हा प्रकार दिसताच काही खासदारांनी चपळाईने त्यांना पकडले. पकडले जातानाच त्यांनी बुटातून सभागृहात पिवळा धूर पसरवला. दरम्यान खासदारांनी त्यांना चांगला चोप देऊन सुरक्षारक्षकांच्या ताब्यात दिले. घुसखोरीच्या या घटनेचा खलिस्तान चळवळीचा समर्थक गुरपतवंतसिंग पन्नू याने अलीकडेच दिलेल्या धमकीशी काही संबंध आहे का याचीही चर्चा होते आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशन ४ डिसेंबरपासून सुरू झाले. त्यानंतर दोनच दिवसांनी, ६ डिसेंबर रोजी गुरपतवंत सिंग पन्नू याने पुन्हा संसदेवर हल्ला करण्याचा इशारा एका व्हिडिओद्वारे दिला. संसदेवर यापूर्वी झालेल्या हल्ल्याला १३ डिसेंबर रोजी २२ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने पुन्हा संसदेवर हल्ला केला जाईल असे त्याने आपल्या व्हिडिओत म्हटले होते. १३ डिसेंबर २००१ साली संसदेवर झालेल्या हल्ल्यातील आरोपी अफजल गुरू याला नंतर फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. पन्नू याच्या व्हिडिओमध्ये अफझल गुरूचा फोटोही झळकवण्यात आला होता. पन्नूने दिलेल्या इशाऱ्याचा बुधवारी संसदेत झालेल्या घुसखोरीशी संबंध आहे अथवा नाही हे तपासाअंती समोर येईलच. संसदेवरील हल्ल्याच्या स्मृतिदिनीच पुन्हा संसदेत अशी घुसखोरी होणे हे निश्चितच संसदेच्या सुरक्षा व्यवस्थेत गंभीर त्रुटी असल्याचे उघड करणारे आहे. या घटनेची गंभीर दखल घेऊन यामागे कोणाचा हात आहे हे तपासण्याची गरज आहे.

# महाड मतदारसंघात विकासकामांचे पारडे जड

**खबरबात**
**शैलेश पालकर**



महाड विधानसभा मतदारसंघाचे राजकारण प्रवाही आहे. राजकीय बदलांनंतर आता आमदार भरत गोगावले यांनी गेल्या दीड दोन वर्षांमध्ये महाड १९४ विधानसभा मतदारसंघामध्ये आणलेली भरीव विकासकामे व निधी, कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश अशी कामे करून लोकनेतेपदापर्यंत पोहचताना तीन वेळा बिगरकाँग्रेसी आणि चौथ्यावेळी काँग्रेसी या समीकरणातून काँग्रेस पक्षच नेस्तनाबूत करण्यात यशस्वी झाले आहेत. याखेरीज, राज्याच्या पुरवणी बजेटमध्ये महाड मतदारसंघातील ग्रामीण व जिल्हा परिषदेच्या रस्त्यांसाठी भरघोस निधी आणला असून ग्रामपंचायतींमध्ये समर्थकांना प्रतिष्ठा मिळवून दिल्यानंतर आता पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेच्या उमेदवारीबाबत दमदार पाऊल टाकले आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पात महाड विधानसभा क्षेत्राचे आमदार भरत गोगावले यांचा पाठपुरावा आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे त्यांच्या शब्दाला असलेला मान यामुळे महाड मतदारसंघामधील ग्रामीण रस्ते आणि जिल्हा परिषदेच्या रस्त्यांसाठी यासोबतच ट्रामा केअर, शासकिय विश्रामगृहासाठी भरघोस निधी मंजूर करून घेतला आहे. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारच्या दोन वर्षांच्या काळातील तीन अर्थसंकल्पात महाड मतदारसंघातील ९० टक्के ग्रामीण रस्त्यांची मजबुती आणि रुंदीकरण पूर्ण झाले आहे. याखेरीज गेली महाडमधील ट्रामा केअरमधील सोयीसुविधा वाढवाव्यात अशी मागणी होत होती. आमदार गोगावलेंच्या मागणीमुळे महाडच्या ट्रामा केअरसाठी तीन कोटी पाच लाखांचा निधी मंजूर झाला आहे. महाड मतदारसंघातील दासगांव व पोलादपूर येथील शासकिय विश्रामगृहाच्या बांधकामासाठीदेखील आठ कोटी २० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. आमदार भरत गोगावले यांच्या माध्यमातून मतदारसंघात होत असलेल्या विकासकामांच्या धडाक्यामुळे सर्वपक्षीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवसेनेकडे आकर्षित होत असून हा मतदारसंघ शिवसेनामय झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात महाडमधील ट्रामा केअर सेंटरमधील मॉड्युलर शस्त्रक्रिया गृह आणि मॉड्युलर अतिदक्षता विभागाच्या कामासाठी तीन कोटी ३६ लाख, दासगांव येथील नवीन शासकीय विश्रामगृहासाठी पाच कोटी ५६ लाख व पोलादपूर येथील शासकीय विश्रामगृहासाठी दोन कोटी ६९ लाखांची तरतूद करण्यात आली आहे.

महाड विधानसभा मतदार संघातील महाड उपविभागातील ग्रामीण रस्त्यांकरीता १६ कोटी १६ लाखांची तरतूद केली असून त्यामध्ये बागमांडला-आंबेत-टोळ-वीर रस्ता, बिरवाडी-वाळण-सांदोशी रस्ता, कुंभार्डे आदिवासीवाडी रस्ता, भोमजई मोहल्ला रस्ता, महाडिककोंड जोडमार्ग रस्ता, साकडी बौद्धवाडी रस्ता, करंजखोल कृष्ण मंदिर ते राजिप शाळेपर्यंत रस्त्याचे बांधकाम, कुर्ला रस्ता, आदिस्ते सुतारकोंड ते खैरंडेवाडी रस्त्याचे बांधकाम, वाळण झोळीचा कोंड भांदेकोंड येथे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण, शिरसवणे धनगरवाडी रस्ता, आंबवडे सावळेवाडी रस्ता, विन्हेरे पारदुलेवाडी रस्ता, नातोंडी गोठकरवाडी रस्त्याचे बांधकाम, विन्हेरे शिरसावने कावळे ते रा.मा.९६ला मिळणारा रस्ता, ओवळे जोडरस्ता, खैरे आदिवासीवाडी रस्ता, तेलंगे जोडमार्ग, वरंध शंभुनगर येथे रस्ता, गोंडाळे बौद्ध रस्त्याचे बांधकाम, आंबवडे सावळेवाडी रस्ता, विन्हेरे पारदुलेवाडी रस्ता, नातोंडी गोठकरवाडी रस्त्याचे बांधकाम, विन्हेरे शिरसावने कावळे ते रा. म. ९६ला मिळणारा रस्ता, जोडरस्ता, खैरे आदिवासीवाडी रस्ता, तेलंगे जोडमार्ग, वरंध शंभुनगर येथे रस्ता, गोंडाळे बौद्ध रस्त्याचे बांधकाम रा. म. ९६ ते कोकरे बौद्धवाडी रस्त्याचे बांधकाम, तळीये मधलीवाडी ते शिंदेवाडी रस्त्याचे बांधकाम, राजेवाडी कनेक्शन रस्त्याचे बांधकाम, माझेरी रस्ता तयार करणे, खेडेकरवाडी रस्त्याचे बांधकाम, रोहन वलंग आदिस्ते केंबुर्ली येथे रस्ता, शिरसवणे धबेकरवाडी येथे रस्ता, आंबेशिवथर ते आंबेनळी रस्ता, गिट आंबेशिवथर ते सह्याद्रीवाडी रस्ता, रा. म. ९६ ते नेरव सुतारवाडी रोड आदी रस्त्यांची कामे महाड तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांसोबत तेथील स्थानिक कार्यकर्त्यांना रस्त्यांच्या कामातून रायगड जिल्हा परिषद आणि महाड पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी सक्षम स्थिती प्रदान करण्यास उपयुक्त ठरणार आहे.

उपविभाग पोलादपूरमधील रस्त्यांसाठी २२ कोटीची तरतूद असून त्यामध्ये बोरज उमरठ खोपट ढवळे प्रजिमा १०९ कि.मी. ००० ते ५५०० रस्ता, कोंढवी धामणदेवी महारगुल जननीदेवी रस्ता, राष्ट्रीय महामार्ग १७ ते सडवली रस्ता, चरई कासारवाडी रस्ता, पार्ले आदिवासीवाडी भैरीमंदिर गाव १२० यांना जोडणाऱ्या रस्त्याचे बांधकाम, धामणदेवी-सुतारवाडी रोडचे बांधकाम, तुर्भे बुद्रुक अंतर्गत रस्ता, दिवील गाव ग्रामपंचायत अंतर्गत रस्त्याचे बांधकाम, वांद्रेवाडी रस्ता तयार करणे, महाबळेश्वर ते कुंभळवणे ग्राम रस्त्याचे बांधकाम, मोरगिरी धनगरवाडी रस्ता, कापडे महाळुंगे दुर्गवाडी रस्ता, कोंढवी धामणदेवी ते जननीदेवी ते भैरी मंदिर गाव रस्ता, भोगाव खुर्द ते कातळी गावपर्यंत रस्त्याचे बांधकाम, कोतवाल खुरेववाडी गावापर्यंत रस्ता, पोलादपुर किनेश्वर ताम्हाणे रानपार घाट ते श्रीक्षेत्र पार रस्ता या विकासकामांनी सर्वसामान्य मतदारांपर्यंत शिवसैनिक जोडला जाणार असल्याचे राजकीय चित्र अन्य राजकीय पक्षांना कार्यकर्ते बघण्यास भाग पाडणारे आहे.

उपविभाग माणगावमधील रस्त्यांसाठी ११ कोटी ४० लाखाची तरतुद असून नांदवी मधेगाव येथील आदिवासी गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम, मढेगाव आदिवासी गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम, वडघर मुद्रे ते रोहिदास बौद्धवाडी रस्त्याचे बांधकाम, मढेगाव काँक्रीट रस्त्याचे बांधकाम, रिले पाचोळे जोड रस्त्याचे बांधकाम, डोंगरोळी खालचीवाडी वरचीवाडी रोड ग्रा. मा. २० तयारी, देगाव आदिवासीवाडी रोड ग्रा. मा. ३३ तयारी मोरेवाडी रस्त्याचे बांधकाम, मांजरवणे रस्त्याचे बांधकाम, जांभुळमाळ रस्त्याचे बांधकाम, चेन रोडचे बांधकाम, कचरा रस्ता बांधकाम, मलयचीवाडी रस्त्याचे बांधकाम, मढेगावकोंड कनेक्टर रोडचे बांधकाम, गोवले वणी अंतर्गत संयुक्त रस्त्याचे बांधकाम, सिलिम अंतर्गत कनेक्टर तयार करणे, बागेत रस्ता बांधणे, कुंभाते येथील आदिवासी गाव जोड बांधकाम, मांडवकरवाडी संयुक्त रस्त्याचे बांधकाम, निजामपूर ते पानस्पे रस्त्याचे बांधकाम, कुंभारते येथे रस्ता बांधकाम, अबदुंगी येथे रस्त्याचे बांधकाम, कोस्ते बु. आदिवासी वाडी रस्त्याचे बांधकाम, करंजेवाडी कनेक्शन रस्त्याचे बांधकाम, टाउनशिप सांधे तयार करणे; माणगाव तट बु. निजामपूर रस्त्याचे बांधकाम. बोरवाडी ते माशिंदेवाडी रस्त्याचे बांधकाम, भिनाड कोशिंबळे रस्त्याचे बांधकाम, कोशिंबळे ते निजामपूर रस्त्याचे बांधकाम, र. म. क्र.१७ ते विघवलीपर्यंत रस्त्याचे बांधकाम, तलावाच्या सुरुवातीला हरिजनवाडी वस्ती रस्त्याचे बांधकाम, खरवली ते आदिवासीवाडी रस्त्याचे बांधकाम, खर्डी बु. आदिवासीवाडी ग्रा. मा. मधील रस्त्याची सुधारणा, कोशिंबळे आदिवासीवाडी रस्ता सुधारणा, चिंचवली रेल्वे रोडची सुधारणा, रामा ते कुरवडे रस्त्याची सुधारणा, मढेगाव नवशी रस्त्याची सुधारणा, मांजरवणे रस्त्याची सुधारणा गोरगाव सोन्याचीवाडी रस्ता सुधारणा, निगुडमाळ या रस्त्याची सुधारणा, पन्हळघर झोरेवाडी ग्रामा-१९९ रस्ता सुधार, भाले तलाव रस्त्याची सुधारणा, हरकोल कोंड रस्ता सुधार, जिता उंबर्डी आदिवासीवाडी गावाची सुधारणा, निळज ते निळज आदिवासी गाव रस्त्याचे पुनर्वसन आदी कामांचा समावेश आहे.

विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यापूर्वी अथवा सर्वोच्च न्यायालयाच्या महाराष्ट्र विधानसभा सभापतींना दिलेल्या आदेशानुसार अपात्रतेच्या कारवाईला सामोरे जाण्यापूर्वी आमदार गोगावले यांनी कार्यकर्त्यांना ताकद देताना स्वत:चा आवाका प्रचंड मोठा करून विरोधकांची रेषा लहान केली असल्याने चौथ्यावेळी कोण? याचे उत्तर आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये जनतेकडून काँग्रेसमुक्त करीत काँग्रेस सोडून गेलेल्या कार्यकर्त्यांना दिले जाणार हे निश्चित आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# भारत सरकारने ३६ हजारहून अधिक वेबसाइट केल्या ब्लॉक!

सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्मवरील ३६,०००हून अधिक यूआरएल ब्लॉक करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. आयटी मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी काही सोशल मीडिया ॲप्सना यूआरएल ब्लॉक करण्यास सांगितले आहे आणि त्यापैकी बहुतेक विनंत्या एलोन मस्कच्या एक्स (ट्विटरला) पाठवण्यात आल्या आहेत. सरकारने आतापर्यंत बऱ्याच ॲप्सना वापरकर्त्यांच्या डेटाचा गैरवापर केल्याबद्दल आणि देशाबाहेरील सर्व्हरवर अनधिकृतपणे प्रसारित केल्याबद्दल हे यूआरएल ब्लॉक करण्यात आले आहेत.




सरकार माहिती तंत्रज्ञान कायदा २०००च्या कलम ६९ए अंतर्गत जनतेच्या हितासाठी आवश्यक असलेले निर्देश जारी करण्याचा अधिकार सरकारला प्रदान करते. भारताचे संरक्षण खाते राज्याची सुरक्षा, परकीय राज्यांशी मैत्रीपूर्ण संबंध किंवा सार्वजनिक सुव्यवस्था किंवा वरील संबंधित दखलपात्र गुन्ह्यासाठी इशारा देते, आयटी मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी सीपीआय(एम)च्या जॉन ब्रिटास यांना लेखी प्रतिसादात ही माहिती दिली आहे.

एक्स (ट्विटर) आणि फेसबुकसह सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट, अकाउंट किंवा हॅशटॅग ब्लॉक किंवा काढून टाकण्यासाठी सरकारचा आदेश आल्यानंतर ऑपोझिशन लीडरला ही माहिती दाखवण्यात आली. चंद्रशेखर यांनी शेअर केलेल्या डेटावरून असे दिसून आले आहे की, २०१८ ते ऑक्टोबर २०२३ दरम्यान एलॉन मस्कच्या मालकीच्या एक्स (पूर्वीचे ट्विटर) यांना सरकारकडून सर्वाधिक ब्लॉकिंग ऑर्डर म्हणजेच १३,६६० (१३,६६०) यूआरएल ब्लॉक करण्याच्या ऑर्डर देण्यात आल्या आहेत.

फेसबुक ॲपला १०,१९७, इन्स्टाग्राम ॲपला ३०२३ यूआरएल काढून टाकण्याची सूचना देण्यात आली तसेच यूट्युबला ५,७५९ आणि इतर सोशल मीडिया ॲप्सना ४,१९९ यूआरएल काढून टाकण्याच्या सूचना दिल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने भारतात सुरक्षित, विश्वासू व इंटरनेट वातावरण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने हे आदेश जारी करण्यात आले आहेत. ब्लॉक केलेल्या यूआरएलची संख्या दरवर्षी बदलत असते. २०२०मध्ये ब्लॉक केल्या गेलेल्या यूआरएलची संख्या ९,८४९ एवढी होती.

# मराठी अभिनेते सतीश दुभाषी

**निमित्त**



मराठी रंगभूमीवर जे अजरामर असे कलाकार होऊन गेले. त्यापैकी एक कलाकार म्हणजे सतीश दुभाषी. त्यांचा जन्म १४ डिसेंबर १९३९ रोजीचा. अवघ्या ४१व्या वर्षी त्यांचे निधन झाले, पण त्यांनी आपल्या अल्पशा काळात रंगभूमीवर काम केले ते लक्षात राहणारे असेच होते. सतीश दुभाषींच्या वेगळ्या अभिनयाच्या शैलीसाठी प्रेक्षक पुन्हा पुन्हा नाटकाचा प्रयोग पहात होते. विशेषत: सतीश दुभाषी ज्या दिग्गज कलाकाराबरोबर असायचे त्याच्यासोबत त्यांची सहज अभिनयाची जुगलबंदी पहायला मिळणे हा आनंद होता.

आजच्या पिढीला सतीश दुभाषी माहिती नसतील कदाचित, पण विविध वाहिन्यांवरून कधीतरी एखादा जुना चित्रपट लागतो आणि त्यात तो कलाकार दिसतो. बाळा गाऊ कशी अंगाई, सिंहसन, चांदोबा चांदोबा भागलास का असा एखादा चित्रपट दिसला की नव्या पिढीतले लोक विचारतात कोण आहे हा नट? मस्त काम केलेय. विशेषत: सिंहासनमधील डिकास्टा पाहिल्यावर नव्या पिढीची हीच प्रतिक्रिया येते, कारण अरुण सरनाईक, दत्ता भट, श्रीराम लागू, निळू फुले यांच्यात अल्पसा वाव मिळूनही डिकास्टा लक्षात राहतो तो दुभाषींमुळेच. आज सतीष दुभाषी म्हणजे चित्रपटसृष्टीतील अभिनेते होते. अल्पशः आजारानंतर त्यांचे मुंबईतील एका रुग्णालयात निधन झाले, एवढेच लोकांना माहिती आहे, पण त्यांनी जे १९७०चे दशक गाजवले आहे त्याबाबत अनेकांना माहिती नाही.

पुरुषोत्तम दारव्हेकरांची 'अबोल झाली सतार'मधील अपघातात हात तुटल्यामुळे सतार वाजवू न शकणाऱ्या कलाकाराची तगमग भयानक होती. सतीश दुभाषींचा मृत्यू १९८०च्या दशकात झाला होता. त्या वेळी व्हिडीओ चित्रिकरणाचा शोधही नव्हता. त्यामुळे त्यांची नाटके पहायला मिळत नाहीत, पण पुरूषोत्तम दारव्हेकर, पु. ल. देशपांडे, शंन्ना नवरे, वसंत कानेटकर यांच्या शब्दांना आणि नाटकांना न्याय देणारा कलावंत अशीच सतीष दुभाषींची ओळख होती. त्यांची अंमलदार, सूर राहू दे, आनंद ही नाटके खूप गाजली आहेत. यातील आनंद म्हणजे राजेशखन्नाचा गाजलेला आनंद हा सिनेमा. तेच कथानक असलेले हे नाटक तितक्याच ताकदीने रंगभूमीवर गाजले हे अनेकांना माहितीही नसेल.

कन्या सासुरासी जाये, कोंडी, चक्रव्यूह या नाटकांचेही शेकडो प्रयोग झाले, पण त्यांचे तुफान गाजले ते नाटक म्हणजे पु. ल. देशपांडे यांचे ती फुलराणी. सगळ्या चांगल्या गोष्टींची ही जुगलबंदी होती. त्यामुळे हे नाटक नक्की कोणाचे हे सांगणेही कठीण. पु. ल. देशपांडे यांचे शब्द. भाषाशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी आव्हान वाटावे अशी संहिता. मूळच्या पिग्मिलियनच्या नाटकाचा मराठीतील अस्सल रूपांतर. भक्ती बर्वेचा टायटल रोल. यात कमाल केली ती सतीष दुभाषींनी. भक्ती बर्वे आणि सतीश दुभाषी हे दोघे इतके बेभान होऊन हे नाटक करायचे की त्या आनंदात प्रेक्षक अक्षरश: डुंबायचे. त्या काळात 'ती फुलराणी'चे दौरे प्रचंड होते. त्यामुळे त्यांना अनेक नाटकांसाठी फारसा वेळ देता येत नव्हता. त्यामुळे तूच माझी राणी, देह देवाचे मंदिर या नाटकांचे फारसे प्रयोग झाले नाहीत. त्यानंतर त्यांनी नटसम्राट, नेपोलियन, पार्टी, बिवी करी सलाम अशी वेगवेगळ्या विषयांवरील अनेक नाटके केली. ती फुलराणीनंतर सतीश दुभाषी दीर्घकाळ स्मरणात राहिले ते वसंत कानेटकर यांच्या बेईमान या नाटकात. त्यानंतर आले ते सतीश दुभाषींचे आणखी एक जुगलबंदी असलेले नाटक. ते म्हणजे विजय तेंडुलकरांचे शांतता कोर्ट चालू आहे. रंगभूमीवर अल्पकाळ राहून दीर्घकाळ स्मरणात राहणारा हा अभिनेता. टीव्ही आणि वाहिन्यांच्या जमान्यात हा नट आज हयात असता तर तो छोटा पडदाही दीर्घकाळ त्याने व्यापून टाकला असता, इतका हा असामान्य कलाकार होता.

**-साभार इंटरनेट**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : मार्गशीर्ष महिना हा व्रतवैकल्यांचा महिना म्हणून ओळखला जातो. महिला वर्ग या महिन्यात आलेल्या प्रत्येक गुरुवारी लक्ष्मी देवीची पूजा करीत असतात. पुजेची सामुग्री खरेदी करण्यासाठी उरण बाजारात महिला वर्गाने गर्दी केली होती. बाजारपेठेत लक्ष्मी देवीचे मुखवटे, दागिने, पुजेचे इतर साहित्य विक्रीसाठी आले आहे.** (छाया : दिनेश पवार)

## आरोग्य प्रहर

# चांगल्या त्वचेसाठी 'हे' नक्की खा!

सौंदर्य टिकवून ठेवायचे असेल तर सातत्य राखणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामध्ये विविध ट्रीटमेंट असोत, सनस्क्रीन आणि मॉइश्चरायझर असो, यांच्या बरोबरीने निरोगी राहण्यासाठी योग्य आहार आणि विहार अतिशय महत्त्वाचे आहेत.



प्रत्येक रुग्ण डॉक्टरांना पथ्य-पाण्याबद्दल विचारतो. एक गोष्ट लक्षात ठेवा विशिष्ट पदार्थ भरपूर प्रमाणात खाल्ल्याने आपण लगेच तरुण दिसू शकत नाही, परंतु या पदार्थांचे नियमित सेवन वार्धक्यातदेखील छान दिसण्यात व छान वाटण्यात मदत करते.

ग्रीन टी, तेलकट मासे, डार्क चॉकलेट, विविध भाज्या, आळशीच्या बिया, सर्व प्रकारची फळे विशेषतः डाळिंब, केळी आणि लिंबूवर्गीय फळे, व्होकॅडो, ऑलिव्ह ऑइल हे काही महत्त्वाचे अन्नघटक आहेत.

ग्रीन टीचे काही अधिक फायदे आहेत. तो स्ट्राँग अँटीऑक्सिडंट आहे. ग्रीन टी रक्त पातळ करते, जे आपल्या हृदयासाठी फायदेशीर आहे, परंतु छोट्याशा शस्त्रक्रियेतसुद्धा जास्त रक्तस्त्राव करू शकते.

रावस, सुरमई आणि बांगडा यासारख्या तेलकट माशांमध्ये ओमेगा थ्री फॅटी सिड भरपूर प्रमाणात असतात. हे सिड त्वचेवरील तेलकट आवरण टिकवून ठेवते, ज्यायोगे त्वचा मुलायम राहते आणि सुरकुत्या कमी प्रमाणात तयार होतात. त्वचा शुष्क न झाल्यामुळे त्याच्यावर बारीक चिरा पडत नाहीत व ॲलर्जीचे प्रमाण आटोक्यात राहते. या माशांमधून प्रथिनांचा पुरवठा भरपूर होतो, ज्याच्या उपयोगाने त्वचेमध्ये कोलॅजेन आणि इलास्टिन या तंतूंची नवनिर्मिती होत राहते. हे दोन तंतू त्वचेला नितळ, लवचिक. मुलायम व गुबगुबीत करतात. माशांमध्ये सेलेनियम हे मूलद्रव्य भरपूर प्रमाणात असते. हे द्रव्य डीएनएच्या निर्मितीला आवश्यक असते, ज्यामुळे त्वचा पेशींना होणारी इजा रोखून नवीन पेशी निर्माण होतात.

सर्व प्रकारच्या भाज्यांमध्ये वेगवेगळी अँटीऑक्सिडेंट असतात. शिवाय त्यातील तंतूमय पदार्थ मोठ्या आतड्यातील लॅक्टोबॅसिलाय या चांगल्या जीवाणूंच्या वाढीला मदत करतात. हे जीवाणू त्वचेचे आरोग्य राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात.

संत्री, मोसंबी, लिंबे आणि पेरू ही फळे म्हणजे क जीवनसत्वाची कोठारेच आहेत. त्यांच्यामुळे अतिनील किरणांचा दुष्परिणाम रोखण्याबरोबरच त्वचेवरील पिगमेंटेशन कमी होण्यास मदत होते.

# जांबरुंग धरणाचे काम सुरू

‘रामप्रहर’च्या बातमीची दखल



**खालापूर : प्रतिनिधी**

मागील दोन वर्षे रखडलेल्या व १९८० मध्ये मंजूर झालेल्या जांबरुंग धरणाच्या कामाचा पुनश्च श्रीगणेशा करण्यात आला आहे. पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत धरणाच्या बांधकामासाठी लागणारी मशिनरी पुजन करून प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यात आली आहे. रखडलेल्या जांबरुंग धरणासाठी दै. रामप्रहरमधून वाचा फोडण्यात आली होती तसेच पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरून जाब विचारण्यात आला होता.

४३ वर्षांत फक्त २० टक्के काम झाले असून धरण पूर्ण होण्यास किमान दोन वर्षांचा कालावधी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी मे २०२२ मध्ये जांबरुंग केळवली परिसरातील नागरिकांची बैठक घेऊन हे धरण कुठल्याही परिस्थितीत २०२३मध्ये पूर्ण करण्यात येईल त्यासाठी लागेल तो हातभार लावण्याचे आश्वासन जांबरुंग परिसरातील रहिवासी यांना दिले होते. तर ठेकेदाराने थकीत सहा कोटीची रक्कम वसूल करून दुसऱ्याच महिन्यात पलायन केले होते. आमदारांनी व मंत्र्यांनी आदेश देऊन न ही ठेकेदार काम सुरू करत नसल्याने रेल्वे पट्ट्यातील नागरिक संतप्त होत आमचे धरण होईल का की नुसता आश्वासनचा पाऊस असा सवाल केला होता.

धरणासाठी २०१९ मध्ये वॉटर फ्रंट प्रायव्हेट लिमिटेडचे मालक मुंदडा या मराठवाड्यातील ठेकेदार एजन्सीने काम घेतले. त्यानंतर सब ठेकेदाराला काम देण्यात आले. शासनाने या कामासाठी १५ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला. ठेकेदाराने दोन डम्पर, एक पोकलेन व रोलर, अशी मोजकीच मशिनरी आणून जेमतेम आठ महिने काम केले आणि बिल मिळत नसल्याचा बहाणा करीत मागी दोन वर्षे काम बंद होते.

या धरणाच्या निर्मितीने १८१ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्याने या भागाचा विकास होण्यास मदत होणार आहे. १९८० साली मंजूर झालेल्या या धरणासाठी ४९ लाख २० हजार ८७१ रुपये खर्चाची योजना ४३ वर्षांत तब्बल ९१ कोटींच्या घरात पोहचली आहे.

दरम्यान, धरणाच्या बांधकामासाठी जांबरुंग ठाकूरवाडीतील १७ आदिवासींच्या जमिनी १९८० साली संपादित करण्यात आल्या आहेत.

# आदिवासी महिलांकडून कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेसाठी घेतले २७०० रुपये

## नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रकार

**पाली : प्रतिनिधी**

कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर आदिवासी महिलांकडून प्रत्येकी २७०० रुपये घेतल्याचा संतापजनक प्रकार नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात घडला आहे. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते अॅड. काशिनाथ ठाकूर व सुधागड तालुक्यातील महेश पोंगडे महाराज यांनी बुधवारी (दि. १३) संबधीत पीडित लोकांचा व्हिडीओ काढून समाज माध्यमांवर आणि संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पाठवून आवाज उठविल्यानंतर ही बाब समोर आली आहे.

लोकसंख्या नियंत्रणासाठी शासकीय आरोग्य केंद्रात सरकारकडून मोफत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्या जातात, मात्र नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात या शस्त्रक्रियेसाठी प्रत्येकी २७०० रुपयांची मागणी केली जात असल्याचे उघड झाले आहे. मिळालेल्या माहितीनूसार, सुधागड तालुक्यातील वाकण गाव आदिवासी वाडीतील महिला शुक्रवारी (दि. ८) कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झाली होती.



डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे शस्त्रक्रियेसाठी बाहेरुन येणाऱ्या डॉक्टरने त्या महिलांची कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली. त्यांच्यावर तीन दिवस प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू होते. दरम्यान, उपचार झाल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले, मात्र त्यावेळी तेथील महिला अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने रुग्णाकडून २५०० रुपये शस्त्रक्रियेचे व टाक्याचे २०० रुपये असे एकूण २७०० रुपये घेतले, असे पीडित कुटुंबीयांनी सांगितले.

दुर्गम भागातील महिलांबाबत घडलेली ही बाब अतिशय गंभीर आहे. साहित्य उपलब्ध नसल्यास ते खरेदी करण्याचे अधिकार रुग्णालयातील अधिकाऱ्यांना आहेत. त्यामुळे टाक्याचे पैसे रुग्णांकडून घेणे चुकीचे आहे. याबाबत जिल्हा आरोग्य विभागातील वरिष्ठांसमवेत घटनास्थळी जाऊन माहिती घेतली जाईल. तसेच जिल्हा स्तरावर या प्रकरणाची चौकशी केली जाईल. रुग्णांना पैसे परत मिळविण्याचा नक्कीच प्रयत्न केला जाईल, असे नागोठणे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य शिरसाठ यांनी सांगितले.

# रोगांपासून आंबा पिकाचे संरक्षण करा

## बागायतदारांना कृषी विभागाकडून आवाहन



**अलिबाग : प्रतिनिधी**

आंब्याच्या झाडांवर सध्या मीजमाशी आणि शेंडेअळीचा प्रादुर्भाव दिसून येत असून यामुळे रायगडमधील बागायतदार त्रस्त आहेत. या दोन्ही रोगांच्या प्रादुर्भावामुळे आंब्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेऊन कीड व रोगांपासून आंबा पिकाचे संरक्षण करण्यासाठी बागायतदारांनी योग्य उपाययोजना कराव्यात, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

रायगड जिल्ह्यात ४२ हजार हेक्टर क्षेत्र आंबा लागवडीखाली आहे. यातून दरवर्षी २१ हजार मेट्रीक टन इतके उत्पादन अपेक्षित असते, परंतु दरवर्षी रोगाचा प्रादुर्भाव नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकरयांना अपेक्षित उत्पादन मिळत नाही. यंदाही कीडरोगाने आंब्यावर संकट ओढवले आहे. नोव्हेंबरच्या अखेरीस आणि डिसेंबरच्या सुरूवातीपासून आंब्याला मीजमाशी आणि शेंडेअळीने ग्रासले आहे.

शेंडे पोखरणारी अळी पालवीच्या दांड्याला छिद्र पडून आत शिरते व आतील भाग पोखरून खाते. परिणामी किडग्रस्त फांदी सुकून जाते. प्रादुर्भित भागात अळीची विष्ठा व मृतपेशी आत राहिल्यामुळे फांद्यांवर गाठी निर्माण होतात व अशा फांद्या अशक्त राहतात. मिजमाशी प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी बारीक गाठी निर्माण होतात व नंतर त्या ठिकाणी छोटेसे छिद्र असलेला काळा डाग दिसून येतो.

**अशा उपाययोजना करा**

किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास प्रादुर्भाव कमी असताना किडग्रस्त पालवी किडीच्या अवस्थेसह काढून नष्ट करावी आणि नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. मिजमाशी तसेच फळमाशी व्यवस्थापनासाठी आंबा झाडाच्या विस्ताराखालील जमीन नांगरावी किंवा झाडाखाली माती १० ते १२ सेमी खोल उकरून घ्यावी जेणेकरून किडीच्या सुप्तावस्था नष्ट होण्यास मदत होईल.

आंबा पालवीवर तसेच मोहरावर करपा रोगाचा प्रादूर्भाव दिसून येण्याची शक्यता असून रोगामुळे कोवळ्या पानांवर करड्या तपकिरी रंगाचे खोलगट आणि पिवळसर कडा असलेले डाग दिसून येतात. करपा रोगामुळे मोहोर तांबुस होवून वाळतो तसेच फुलगळ होते. रोगास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कार्बन्डॅझिम १२ टक्के अधिक मन्कोझेब ६३ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची नाशकाची २० ग्रॅम प्रति १०लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

ढगाळ हवामान राहण्याची शक्यता असल्याने पालवी ते मोहोर अवस्थेत असलेल्या आंब्यावर तुडतुड्यांच्या प्रादूर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. तुडतुडे मोहारातील, कोवळ्या पालवीतील रस शोषून घेतल्यामुळे माहोराची गळ होते यासोबतच तुडतुडे मधासारखा चिकट पदार्थ शरीरावाटे बाहेर टाकतात आणि तो पानांवर पडल्यामुळे त्यावर काळी बुरशी वाढते. बागेचे वेळोवेळी सर्वेक्षण करून तुडतुडे पिल्लांच्या अवस्थेत असतानाच किटकनाशकाची फवारणी करावी. प्रादूर्भाव दिसून येत असल्यास डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही ९ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर तसेच खोडावर फवारणी करावी.

मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी शक्यतो टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाड़ी परागीकरणाचा कालावधी वगळून (सकाळी ९ ते दुपारी १२) फवारणी करावी. किटकनाशक किंवा बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस करावी, असे उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे यांनी सांगितले.

# अलिबागमध्ये प्लास्टिक बंदी जनजागृती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मानीभुते-अलिबाग या ठिकाणी कौशल्य विकास व स्वच्छता उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जे.एस.एस रायगडच्या माध्यमातून जे.एस.एम कॉलेज अलिबाग व जे.एस.एस रायगडच्या माध्यमातून प्लास्टिक बंदी जन जागृती उपक्रम राबवण्यात आला.

उपक्रमावेळी गावकऱ्यांना व एन.एस.एस स्वयंसेवक यांना ह्या प्रसंगी कागदी व कापडी पिशव्या बनवण्याचे मार्गदर्शन मुख्य मार्गदर्शक डॉ. विजय कोकणे यांच्या माध्यमातून करण्यात आले. त्याचबरोबर सहाय्यक प्रशिक्षिका प्रतिक्षा सचिन चव्हाण यांनी उपस्थितांकडून सराव करून घेतला तर कार्यक्रमाचे आभार प्रतीक्षा चव्हाण यांनी मानले.

भारत सरकारच्या कौशल्य विकास योजने अंतर्गत कार्यक्रम राबवित असतांना या वेळी जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक डॉ. विजय कोकणे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण गायकवाड, डॉ. पंकज घरत, प्रा. आश्विनी आठवले, कर्मचारी प्रतिक्षा चव्हाण (अकाउंट मॅनेजर), दिपंकर राऊळ हे कर्मचारी व स्वयंसेवकदेखील कार्यक्रम राबवित असताना उपस्थित होते.



# न्याय, हक्कांसाठी उपोषण

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांना मूलभूत सुविधांपासून वंचीत ठेवणाऱ्या सबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी व आदिवासी बांधवांना रस्ता, पाणी, स्मशानभूमी आणि समजमंदिरसारख्या मूलभूत सुविधा पुरवण्यांच्या मागण्यांसाठी पनवेल, पेण तालुक्यातील आदिवासी बंधू भगिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत.

# पेणमध्ये आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील कमल बहुउद्देशीय संस्थेतर्फे विविध आजारावर तपासणी उपचार व औषधे मिळवून देण्यासाठी आमटेम येथे आरोग्य शिबिर झाले. यासाठी एमजीएम हॉस्पिटल, व ग्रामपंचायत आमटेम यांच्या सहकार्याने आयोजित शिबिरात शेकडो रुग्णांनी तपासणी केली.

या शिबिरावेळी संस्था अध्यक्ष विमल सूर्यकांत तांबोळी, सचिव सूर्यकांत तांबोळी, सरपंच लक्ष्मण तांबोळी, उपसरपंच रवींद्र गायकर, व सदस्य तसेच सामाजिक कार्यकर्ते हिरामण तांबोळी उपस्थित होते.



या वेळी हृदयरोग शस्त्रक्रिया, त्वचारोग, ईसीजी, नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया, कृत्रिम अवयव, अस्थिव्यंग सर्जरी, मूत्रपिंड तपासणी, बालरोग तज्ञ आदी आजारांवर तपासणी करण्यात आली.

# आदिवासी मुलीसोबत अश्लील कृत्य

## दुकानदारावर गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

कार्ली येथे अल्पवयीन आदिवासी मुलीसोबत चायनीज भेळ विक्रेता गोविंद इंदरे (रा. कार्ली, ता.पेण) याने अज्ञानपणाचा फायदा घेऊन तिचा हात धरत स्वत:च्या घरात नेऊन मुली सोबत अश्लील कृत्य केले. या केल्याप्रकरणी त्याच्यावर वडखळ पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात अँट्रासिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ई-निविदा सूचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदनीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.

| अ क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडून) | निविदा अनामत रक्कम (रु.) | कोरी ई निविदा किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पम्पा/विद्युत/५७/२०२३ | पनवेल महानगरपालिकेमार्फत करण्यात विद्युत येणाऱ्या विकास कामात अडथळा निर्माण करणारे महावितरण कंपनीचे विद्युत खांब, विद्युत वाहिन्या स्थलांतरीत करणे व नवीन वीजपुरवठा घेणे कामी विद्युत व्यवस्थेच्या उभारणीची दोन वर्षाकरीता कामे करणे. | ९,१०,१७,१९८.०० | ४,५५,०८६,.०० | ३,५४०.०० |
| २. | पम्पा/विद्युत/५६/२०२३ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या भुखंड क्र. २४७ वरील व्यापारीक संकुल १ व २ येथे दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयासाठी विद्युत उपकरणे, वीद्युत जोडणी व सलग्न विद्युत विषयक कामे करणे. | ८३,९१,७७८.०० | ८४,०००.०० | ११८०.०० |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र./पमपा/विद्युत/९९२३/प्र.क्र.१६०/११०८/२०२३
दिनांक - १३/१२/२०२३

Sd/-
अतिरिक्त आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

**जाहीर नोटीस**

अर्जदाराचे वकील
अँड समिर राम कुंभार
मो.नं. ९००४४०२३३०

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर/क. स्तर) यांचे कोर्टात**

दि.चौ. अर्ज नं. १६७९/२०२३
ने.ता. १५/०१/२०२४
नि.८/ड

१) श्रीमती. चंद्रभागा उर्फ भिमाबाई कृष्णा चोरघे
वय ७५ वर्षे, धंदा - गृहिणी
२) श्रीमती. सुंदरा कृष्णा चोरघे
वय ५८ वर्षे, धंदा - गृहिणी
३) श्री. संतोष कृष्णा चोरघे
वय ४३ वर्षे, धंदा-नोकरी
४) श्री. शशिकांत उर्फ सचिन कृष्णा चोरघे
वय ३३ वर्षे, धंदा - नोकरी
५) श्री. समीर कृष्णा चोरघे
वय २३ वर्षे, धंदा-नोकरी
सर्व रा. १ ते ५ रा. शिरवली,
पो. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड
६) सौ. सुनीता देवीदास पाटिल
वय ३९ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. टेंभरी, ता. चौक, जि. रायगड
} **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही } **सामनेवाला**

ज्याअर्थी **कै. कृष्णा कोंडु चोरघे** हे दिनांक ०७/०३/२०२३ रोजी मौजे शिरवली, पो. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची आई कै. पार्वतीबाई कोंडु चोरघे या मौजे शिरवली, पो. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड येथे बऱ्याच वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत. कै. कृष्णा कोंडु चोरघे यांचे नावे खालील वर्णनाच्या मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - कोंडप, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| कोंडप | १ | ० | ०-६८-०० पो.ख.०-०५-०० एकूण ०-७३-०० **पैकी ०-४३-००** | ८.४२ |
| कोंडप | २ | २ | ०-९३-६० पो.ख.०-०७-४० एकूण १-०१-०० **पैकी ०-३३-६७** | ५.५३ |

**कै. कृष्णा कोंडु चोरघे** तसेच त्यांची आई **कै. पार्वतीबाई कोंडु चोरघे** यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

तारीख १३/१२/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक - १३/१२/२०२३

शिक्का

हुकूमावरुन
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, पनवेल

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे जमिनमालक हुमा जमाल सिद्दीकी रा. तळोजे, ता. पनवेल जि. रायगड यांजकडून खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णन :**
**मौजे करवले बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड.**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र ( हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ११ | ३ | ०-१४-२० पो.ख. ०-००-२० एकूण ०-१४-४० | २.५६ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,
दिनांक: १३/१२/२०२३

**सही /-**
**ॲड.निलेश द. हातमोडे**
ॲडव्होकेट

पत्ता : शॉप नं १३०, मुन्सिपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६. मो. नं. ९२२४६३४३२०

**जाहीर नोटीस**

**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

आरटीएस अपिल क्र.४०८/२०२३

१. सौ. शिवानी शिवाजी पाटील,
रा. ९०१, गुरु समृध्दी हाईटस, प्लॉट नं.२ पाम बिच रोड,
सेक्टर-१४, सानपाडा, नवी मुंबई, ठाणे ४००७०५
२. अनिता मनोज आग्रवाल,
३. प्रविण सिताराम आग्रवाल,
४. हर्षा प्रविण आग्रवाल,
५. मनोज कुमार आग्रवाल,
सर्व. रा. व्टीन टॉवर, ४०८ बी, २क्रॉस लेन राजपुत डेअरी
वरती, लोखंडवाला, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३
६. निता धनंजय म्हस्के,
रा. १००२, प्रोगेसीव्ह हायनेस, प्लॉट नं. ५, व ६,
संत ज्ञानेश्वर मार्ग, सेक्टर-१६अ, स्टेट बँक ऑफ
इंडीयाच्या जवळ, सानपाडा, नवी मुंबई ठाणे ४००७०५ ........... **वादी**

**विरुध्द**

१. श्री. सुनिल किसन जाधव,
रा. प्लॉट नं. १३०१, रिमेझोन प्लॉट, खारघर,
ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६
२. तहसिलदार उरण, ता. उरण, जि. रायगड. ४००७०२
३. मंडळ अधिकारी कोप्रोली, ता. उरण, जि. रायगड. ............ **प्रतिवादी**

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे-चिरनेर, ता. उरण, जि. रायगड येथिल तहसिलदार उरण यांचेकडील जा.क्र.हक्कनोंद/कात-५/सुनिल किसन जाधव / १९०५/२६४/२०२३ दिनांक १५/०६/२०२३ रोजीच्या आदेशाविरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक ०२/०१/२०२४ रोजी दुपारी ३:०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवालेयांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
मौजे चिरनेर, ता. उरण, जि. रायगड

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १९३ | २ | ०.६०.२० | ६.५० |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण :- पनवेल.
दिनांक :- १२/१२/२०२३

शिक्का

**सही/-**
उप विभागीय अधिकारी पनवेल
उपविभाग पनवेल

# अत्याधुनिक मासेमारीमुळे पारंपरिक व्यवसाय संकटात

## मासळीवरही परिणाम

**उरण : प्रतिनिधी**

सागरी जलाधिक्षेत्रात एलईडी आणि परप्रांतीय मासेमारीमुळे संकट ओढवले असून त्यामुळे मासळी कमी होऊ लागले आहे. यामध्ये परदेशी मच्छीमार बोटी आणि त्यांच्याकडून होणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून राज्याच्या हद्दीत राजरोसपणे मोठ्या प्रमाणात मासेमारी करीत आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतूनच दररोज लाखो टन मासळी पकडून परराज्यात विक्री केली जात आहे. विद्युत जनसेटवर व एलईडी लाईट लाऊन मोठ्या प्रमाणात मासेमारी करीत असल्याने वर्षभरात मासेमारी हंगामात मिळणारी मासळी एलईडीधारक पकडून पलायन करीत आहेत. याचा विपरीत परिणाम राज्यातील पारंपरिक पद्धतीने आणि प्रगतशिल मासेमारी करणाऱ्या लाखो मच्छीमारांवर होत आहे.



राज्यात जून व जुलै या दोन महिन्यांच्या पावसाळी मासेमारी बंदी असते, मात्र त्यानंतर ही मासळीची आधुनिक तंत्राचा वापर करून लूट केली जात आहे. याचा परिणाम स्थानिक आणि पारंपरिक मासेमारी व्यवसायवर झाला आहे. एलईडी मासेमारी पद्धत म्हणजे मासेमारी बोटीवर विद्युत दिवे घेऊन जात ते समुद्रात पाण्याखाली पेटविण्यात येतात.

या दिव्यांच्या प्रकाशावर मासळीचे थवेच्या थवे आकर्षित होतात. या माश्याना जाळी टाकून पकडले जातात. काही वेळातच मोठ्या प्रमाणात मासळी पकडली जाते. यामध्ये लहान मोठी मासळी पकडली जाते त्यानंतर छोटी मासळी पुन्हा समुद्रात फेकण्यात येते. मात्र यातील बहुतांशी मासळी मरून नुकसान होते.

# तुर्भे रेल्वेस्थानकाजवळ फेरीवाल्यांचा विळखा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे तुर्भे रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. यामुळे तुर्भे स्थानकातून तुर्भे गाव आणि कॉलनीकडे येणाऱ्या रहिवाशांची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत आहे. त्यामुळे पालिकेने यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

तुर्भे विभाग कार्यालयाच्या अंतर्गत तुर्भे जनता मार्केट ते सेक्टर २० रेल्वेस्थानकापर्यंतच्या रस्त्यावर तसेच पदपथावर १०० ते १५० फेरीवाले बेकायदा व्यवसाय करत आहेत. यामुळे सायंकाळी गर्दीच्या वेळी कामावरून घरी येताना तुर्भे गाव आणि कॉलनी येथील रहिवाशांना या



**रस्त्यावर मोठ्या प्रमाणात बस्तान**

फेरीवाल्यांचे अडथळे पार करत यावे लागत आहेत. बऱ्याचदा फेरीवाल्यांमध्ये जागेसाठी आपापसात हाणामारीदेखील होते. तसेच गर्दीची संधी साधून काही पाकिटमारही या ठिकाणी फोफावले आहेत.

फेरीवाले पदपथ आणि रस्त्यावरही बसत असल्याने पादचाऱ्यांना अनेकदा दुसऱ्या मार्गेतून चालावे लागते. परिणामी या ठिकाणी अनेकदा किरकोळ अपघातही घडले आहे. तुर्भे नाका पादचारी पूल ते वाशी तुर्भे लिंक रोडवरील पूल इथपर्यंतचा रस्ता केवळ एकेरी मार्ग आहे. असे असतानाही या रस्त्याच्या दोन्ही बाजूला अनधिकृतपणे फेरीवाले बसलेले आढळून येतात. जनता मार्केटमध्ये येणाऱ्या ग्राहकांच्या गाड्याही याच ठिकाणी लागलेल्या असतात. परिणामी केवळ एक गाडी जाऊ शकेल इतकाच रस्ता या ठिकाणी उपलब्ध होतो. अशातच एखादी गंभीर दुर्घटना घडली तर रुग्णवाहिकेला ये-जा करण्यासही अशक्य होते.

> **अतिक्रमण विभागाकडून दैनंदिन कारवाई केली जाते. ज्या ठिकाणी फेरीवाले जागा अडवून व्यवसाय करतात, अशा ठिकाणी कायम अतिक्रमण विभागाची मोहीम राववली जाते.**
>
> **-भरत धांडे, पालिका विभाग अधिकारी, तुर्भे**

रविवारच्या दिवशी ठाणे-तुर्भे मार्गावरील तुर्भे नाका, जनता मार्केट, तुर्भे रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसतात. त्यामुळे वाहतूककोंडी होते. त्यामुळे पादचारी, कामगार आणि नोकरी-व्यवसायानिमित्त येथून ये-जा करणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

# वाशीत कापडी पिशवी वेंडींग मशीन सुविधा सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिकमुक्त नवी मुंबईसाठी एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमांसोबत कापडी पिशव्यांच्या वापराबाबत व्यापक स्वरुपात जनजागृती केली जात असताना बुधवारी (दि. १३) सेक्टर १७, वाशी येथील महाराजा भाजी व फळ मार्केट येथे सीएसआर उपक्रमांतर्गत कापडी पिशवी वेंडींग मशीन सुविधेचे लोकार्पण महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते झाले.

नवी मुंबई सिटी डॉट कॉम या सोशल नेटवर्कच्या सीएसआर उपक्रमामधून ही कापडी पिशवी वेंडिंग मशीन मार्केटच्या ठिकाणी बसविण्यात आली असून वेंडिंग मशीनमध्ये १० रुपयाचे नाणे टाकल्यानंतर



मशीनवरील लाल बटण दाबल्यावर त्यामधील टोमॅटीक प्रणालीव्दारे कापडी पिशवी दिली जाते. साधारणत: ५ ते ६ किलो वजन पेलू शकेल अशा क्षमतेची ही कापडी पिशवी असून जर navimumbaicity.com हे ॲप आपल्या मोबाईलमध्ये मोफत डाऊनलोड करून घेतल्यास पमधील कोड स्कॅन केल्यानंतर मशीनद्वारे मोफत कापडी पिशवी प्राप्त होते.

महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी १० रुपयांचे नाणे टाकून तसेच पाच रुपयांची दोन नाणी टाकून त्याचप्रमाणे पव्दारे कोड स्कॅन करुन प्रत्यक्ष पिशवी प्राप्त करुन घेतली व या मशीनची कार्यप्रणाली जाणून घेतली. नवी मुंबई सिटी डॉट कॉम सोशल नेटवर्कच्या वतीने संस्थापक मेहुल जैन व सह संस्थापक पुजा पवार व श्रुती कांबळे यांनी मशीनच्या कार्यपध्दतीची माहिती आयुक्तांना दिली.

मशीनमधून मिळणाऱ्या कापडी पिशव्यांवर यापुढील काळात संस्थेच्या कामांचा व नवी मुंबई महापालिकेच्या प्लास्टिक प्रतिबंधात्मक संदेशाचा प्रचार करण्यात येईल असे संयोजकांनी सांगितले. आगामी कालावधीत इतरही मार्केटमध्ये अशा प्रकारची सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील असेही सांगण्यात आले.

या वेळी आयुक्त राजेश नार्वेकर यांनी तेथील विक्रेत्यांशी संवाद साधत हे मार्केट एकल वापर प्लास्टिक पिशवीमुक्त ठेवल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले तसेच त्यांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून ग्राहकांनी कापडी पिशव्यांचा वापर करण्याबाबत आग्रही असावे असे आवाहन केले. ग्राहकांनी सोबत कापडी पिशवी आणली नसेल तर त्यांना तेथील वेंडिंग मशीनचा वापर करून कापडी पिशवी उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रोत्साहित करावे असे विक्रेत्यांना सांगतानाच आयुक्तांनी नागरिकांशीही संवाद साधत त्यांना कापडी पिशव्यांचा वापर निग्रहपूर्वक करावा असे आवाहन केले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार म्हसाळ, शहर अभियंता संजय देसाई, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, वाशीचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे, कार्यकारी अभियंता अजय संखे, माजी नगरसेवक संपत शेवाळे आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# मुलांसाठी शिक्षण ही संकल्पना समजून घ्यावी -संदीप नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची प्रगती अपेक्षित आहे. शिक्षणाचे ओझे मुलांना वाटता कामा नये आणि त्यामुळे मुलांसाठी शिक्षण ही संकल्पना प्रत्येकाने समजून घ्यायला पाहिजे, असे मत नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी व्यक्त केले आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या शाळांचे केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन कोपरखैरणे येथील महापालिकेच्या सीबीएसई शाळा क्रमांक ९४मध्ये भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या हस्ते आज झाले. या वेळी महापालिकेच्या शिक्षणाधिकारी अरुणा यादव, विस्तार अधिकारी खुशाल चौधरी, समन्वयक संजय मोरे, शाळेच्या मुख्याध्यापिका अमिता भट्ट शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. महापालिका आणि अनुदानित अशा ३५ शाळांनी या प्रदर्शनामध्ये भाग घेतला असून विद्यार्थ्यांनी त्यांचे विविध वैज्ञानिक प्रकल्प मांडले होते.

अशा प्रकारच्या विज्ञान प्रदर्शनांमधून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक गुणवत्ता प्रदर्शित होत असते. विद्यार्थ्यांमधील प्रयोगशीलतेला



आणि कल्पकतेला संधी मिळत असते, असे सांगून जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी नवी मुंबईतील विद्यार्थ्यांनी अनेक राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिके मिळविल्याचे नमूद केले. शिक्षणावर आपले विचार व्यक्त करताना विद्यार्थ्यांवर शिक्षणाचा दबाव असता कामा नये. मुलांनी व्यक्त व्हायला हवे आणि त्यासाठी आई-वडिलांनी त्यांच्याबरोबर संवाद साधायला हवा.

हल्ली मुलांचा संवाद मोबाईल बरोबर अधिक आणि कुटुंबीयांबरोबर कमी असतो. याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या टाळायला हव्यात त्याची सामूहिक जबाबदारी समाजाची असल्याचेदेखील ते म्हणाले.

# दोन शालेय विद्यार्थ्यांची आत्महत्या

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दोन शाळकरी मुलांनी आत्महत्या केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाचा मानसिक तणाव त्यातून आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल या एकाच दिवशी दोन घटना घडल्या आहेत.

नवी मुंबईतील करावे गावातील तलावात एका पंधरा वर्षीय मुलाने आत्महत्या केल्याची घटना सोमवारी समोर आली. दर्शिल पाटील असे त्या विद्यार्थांचे नाव आहे. दर्शिल हा दहावीत शिकत होता. रविवारी मध्यरात्री तो गुपचूप घरातून बाहेर पडला आणि करावे गावातील तलावात उडी मारून त्याने आपले जीवन संपवले. त्यापूर्वी त्याने आपण कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाही म्हणून आत्महत्या करीत असल्याचा संदेश बहिणीला मोबाईलवर पाठवला होता, मात्र हा संदेश वाचण्यापूर्वीच त्याने जीवन संपवले. वर्षभरापूर्वी त्याच्या वडिलांचे निधन झाल्यापासून तो अबोल झाला होता. तो घरातून बेपत्ता झाल्या नंतर त्याची शोधाशोध सुरू करण्यात आली. त्यात त्याचे मोबाईल लोकेशन करावे गावाचे तलावाचे लोकेशन असल्याचे समोर आल्यावर त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता तलावाजवळ त्याची चप्पल आणि दुचाकी आढळून आली. त्याच आधारे अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्यात उतरून शोध घेतला असता त्याचा मृतदेह आढळला.



दुसऱ्या घटनेत नेरूळ सेक्टर १६ येथे राहणाऱ्या नववीतील विद्यार्थी पृथ्वी ढवळे याने राहत्या घरात चादरीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. यावेळी आई वडील कामानिमित्त बाहेर गेलेले होते. घरात कुणीच नसताना त्याने आपले जीवन संपवले. प्राथमिक माहिती नुसार आत्महत्येपूर्वी लिहलेल्या चिठ्ठीत त्याने अभ्यास जमत नसल्याचे कारण सांगितले आहे.

# द्रोणागिरी हायस्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे द्रोणागिरी हायस्कूल करंजा मराठी माध्यम विद्यालयामध्ये मंगळवारी (दि. १२) शाळा अंतर्गत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यालयाचे चेअरमन नाखवा यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वतीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात



आले. सदर कार्यक्रमाच्या वेळी स्थानिक सल्लागार समितीचे व्हाईस चेअरमन के. एल. कोळी, सदस्य प्रदीप नाखवा आदी उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनामध्ये १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक रांगोळ्या रेखाटल्या होत्या.

या कार्यक्रमावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस. सी. म्हात्रे यांनी विद्यार्थी व पालक यांना प्रोत्साहन देणारे मोलाचे मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन एन. बी. म्हात्रे यांनी केले. या कार्यक्रमात सर्व सेवक बंधू भगिनी सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# दिव्यांग सप्ताहानिमित्त जनजागृती रॅली

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रीम. राधाबाई खेमचंद परमार कर्णबधीर मुलांच्या विशेष शाळेतर्फे जागतिक दिव्यांग सप्ताहाचे औचित्य साधून नवीन पनवेल येथे विशेष जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी चेअरमन सुधीर कांडपिळे, संस्थेचे सचिव प्रमोद वालेकर, सदस्य चारुदत्त भगत, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. जय भंडारकर, सचिव ऋग्वेद कांडपिळे, माजी अध्यक्ष कल्पेश परमार, भावी अध्यक्ष



निलेश पोटे, इनरव्हिल क्लबच्या अध्यक्ष सई पालवणकर तसेच शाळेच्या प्र. मुख्याध्यापिका शैला बंदसोडे, विद्यार्थी-पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

रॅलीची सुरुवात शाळा - श्रेयस हॉस्पीटल- अभ्युदय बँक- बांठीया स्कूल-सिडको कॉलनी- संत साईबाबा शाळा-पोस्ट ऑफीस-शिवा कॉम्प्लेक्स-एचडीएफसी सर्कल-शाळा असे मार्गक्रमण करीत रोटरी शाळेच्या प्रांगणात रॅलीची सांगता झाली.

या वेळी दिव्यांगत्वाबद्दलच्या जनजागृती करण्यात आली. दिव्यांग विद्यार्थ्यांनी लेझीमचे प्रकार व पथसंचलन केले.

# वनराई बंधारे ठरताहेत शेतकरी आणि पशू-पक्ष्यांसाठी वरदान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वनराई बंधारा बांधून पाण्याची पातळी वाढून काही दिवस पाणी येथेच अडविले तर काही महिने या पाण्यामुळे विविध प्रश्न मार्गी लागत असतात. ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते. गुरांच्या पिण्याच्या पाण्यांचा प्रश्न मार्गी लागत असतो.यामुळे गाव पातळीवर बंधारा बांधून पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबविणे काळाची गरज आहे. यामुळे वनराई बंधारे शेतकरी आणी पशू पक्षी साठी वरदान ठरत आहे.

पावसाळा संपताच पाण्याचे विविध स्त्रोत्र तळ गाठत असतात, मात्र काही ठिकाणी हेच पाणी आपण अडवू शकतो. उन्हाळा आला की आपल्याला पाण्याचे महत्त्व समजते कारण विहीर, तलाव, कूपनलिका, ओढे असे पाण्याचे असलेले स्त्रोत्र तळ गाठण्याची स्थिती निर्माण करीत असतात. पाणी हे आपले



जीवन आहे.कारण जल है! तो हम है! अशा पध्दतीचे उच्चार सातत्याने करीत असतो. मात्र त्यांचे आचरणात कोणीही आणत नाही तुरळक ठिकाणी बंधारे बांधून पाणी अडविले जाते. प्रत्येकांनी आपले नैतिक कर्तव्ये म्हणून पाणी अडविले पाहिजे.

पाण्याशिवाय कोणताही सजिव जिवंत राहू शकत नाही पशू, पक्षी, झाडे, मानव यासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असतो. यामुळे बंधारे यांचे महत्त्व जाणून घेवून पाणी अडविले पाहिजे.

या पाण्याचा वापर गुरांची तहान भागविण्यासाठी तसेच जंगळातील प्राणी यांना पिण्यासाठी होत आहे. शिवाय शेतकरी वर्ग यावरती भाजी पाल्यांचे उत्पन्न घेतले जाते. यामुळे रोजगारांचा प्रश्न मार्गी लागत आहे.

# किचकट खुनाच्या गुन्ह्याची उकल केल्याप्रकरणी पनवेल पोलिसांचे कौतुक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत डिसेंबर २०२१ या महिन्यात डोंगराळ भागात एक इसमाचा मृतदेह आढळून आला होता. सदर मृतदेहाचा चेहरा दगडाने ठेचून त्याचा मृतदेह जाळण्यात आला होता. अश्या किचकट खुनाची उकल पनवेल तालुका पोलिसांनी अथक परिश्रमाने अनेक सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे शोध घेऊन तीन आरोपींनं गजाआड केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक व त्यांच्या पथकाचे विशेष



प्रशस्तीपत्रक देऊन कौतुक केले आहे.

गुन्ह्यामध्ये आरोपींनी मयत व्यक्तीस त्याच्याच मोटरसायकलीवरून त्याला दारू पाजून पनवेल तालुक्यातील मालडुंगे डोंगरावर नेले व स्वतः च्या फायद्याकरता मुख्य आरोपीने त्याचा गळा आवळून त्याला ठार मारले. त्यानंतर त्याच्या चेहऱ्यावर दगड टाकून इतर साथीदाराच्या मदतीने चेहऱ्याचा चेंदामेंदा केला व पुन्हा ओळख पटू नये म्हणून त्याच्या अंगावर पेट्रोल टाकून जाळून टाकले व ते तेथून पसार झाले होते. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलीस ठाण्यातील इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक मेहनत घेत या गुन्ह्याची उकल घेण्याच्या दृष्टीने २४ तास मेहनत करून, बारकाईने तपास करून अनेक सीसीटीव्ही फुटेज, पेट्रोल पंप, वाईन शॉप, बियर बार आदी ठिकाणी तपास करून मुख्य आरोपीस कोकणातून व त्याच्या २ साथीदारांना बिहार येथून ताब्यात घेतले असता त्यांनी या खुनाची कबुली दिली असून सध्या ते तळोजा जेल येथे शिक्षा भोगत आहेत.

अत्यंत क्लिष्ट अश्या गुन्ह्याची उकल केल्याबद्दल तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्ष रवींद्र दौडकर यांचे विशेष कौतुक महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी केले असून नुकत्याच नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयात झालेल्या विशेष समारंभात विशेष प्रशस्तीपत्रक देऊन 'गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न' हा पुरस्कार त्यांना देण्यात आला आहे.

निवडक



## जिल्हा समालोचन पुस्तिकेचे प्रकाशन

**रायगड** : सन-२०२२-२३ या वर्षाकरिताची जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन पुस्तिका जिल्हा सांख्यिकी कार्यालय, रायगड कार्यालयामार्फत तयार करण्यात आली असून या पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, जिल्हा अधीक्षक राज्य उत्पन्न व शुल्क विभाग रविराज कोले, उपसंचालक जिल्हा सांख्यिकी कार्यालय वृषाली माकर तसेच जिल्हा सांख्यिकी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. या जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन पुस्तिकेत जिल्हास्तरीय विविध सामाजिक व आर्थिक क्षेत्राच्या स्थितीबाबतची तालुकानिहाय सांख्यिकी आकडेवारी देण्यात आली आहे.

## आगरी मंडळ अध्यक्षपदी हरिश्चंद्र मोरे



**रोहे** : तालुका आगरी ज्ञाती सेवा मंडळाचे अध्यक्षपदी हरिश्चंद्र सखाराम मोरे यांची निवड करण्यात आली आहे. वरसे येथील श्री मारुती भिकू पाटील सभागृहात आयोजित रोहा तालुका आगरी ज्ञाती सेवा मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही निवड करण्यात आली. या वेळी आगरी समाजाचे ज्येष्ठ नेते रामचंद्र म्हात्रे, नंदकुमार म्हात्रे, किशोर मोरे, हरिचंद्र वाजंत्री, हेमंत ठाकूर, रामाशेठ म्हात्रे, नरेश पाटील, विठ्ठल मोरे, लक्ष्मण मोरे आदींसह समाज बांधव उपस्थित होते. कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष अनिल माळी, सचिव विलास म्हात्रे, खजिनदार सचिन मोरे, सहसचिव अतुल पाटील, सहखजिनदार दिलीप म्हात्रे, सहकार शिक्षण तज्ज्ञ मिलिंद म्हात्रे, सदस्य नथुराम ठाकूर, संदेश मोरे, विलास डाके, वामन पारंगे, मोरेश्वर कोल्हटकर, देवचंद्र म्हात्रे, जयवंत मुंगळे, सुरेश पाटील, अशोक ठाकूर, नरेश म्हात्रे, शंकर देवकर, दत्ताराम मोरे, प्रवीण मोरे, रामचंद्र मोरे आदींची निवड करण्यात आली. सर्व कार्यकारिणीचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले.

## श्रीक्षेत्र धोंडपाडा ते महाळुंगे पायी दिंडी



**पेण** : तालुक्यातील धोंडपाडा ते महाळुंगे पायी दिंडी सोहळा १० ते १४ डिसेंबरपर्यंत होत आहे. दिंडीचे प्रमुख गजानन भोईर व सेक्रेटरी हभप केशव कडू आहेत. दिंडीमध्ये काकडा, टाळ मृदूंगाच्या आवाजात वारकरी भजन, गवळण, भारुड, जनाबाईच्या ओव्या गात वारी महाळुंगे (पुणे) येथे पोहचली. या पायी वारीत संजय भगत व सचिन भगत हमरापूर हे दोघे सतत १० वर्षे पायात चप्पल न घालता दिंडी चालत जातात. धोंडपाडा गावाचे वैशिष्ट्य म्हणजे या परिसरामध्ये पहिला प्रथम हरिपाठ सुरू झाला. आज त्याला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानंतर बळवली गावात हरिपाठ सुरू झाला.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत मंगळवारी (दि.१२) वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ११९ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई केली. त्यांच्याकडून ७५,८०० रुपये इतका दंड आकारला आहे. यापुढे वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्यांविरोधात कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# रायगडातील आरोग्य यंत्रणा होणार बळकट

## मंत्री आदिती तटकरे यांच्या पुढाकाराने आरोग्य यंत्रणेचे विविध प्रश्न मार्गी

**रायगड : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेचे बळकटीकरण करण्यासाठी राज्य शासनामार्फत सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी सांगितले. रोहा महिला, बाल रुग्णालय तसेच जिल्ह्यातील इतर उपजिल्हा रुग्णालयाबाबत नागपूर येथील विधानभवनात मंत्रीमहोदयांचे दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती.



या वेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, अवर मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मिलींद म्हैसकर, सार्वजनिक आरोग्य विभाग आयुक्त धीरजकुमार, सहसंचालक (रुग्णालय), आरोग्यसेवा डॉ. विजय कंदेवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने आदी उपस्थित होते.

भुवनेश्वर येथे १०० खाटांचे महिला रुग्णालय नवजात शिशु कक्षासह स्थापन करण्याबाबत शासनाने २४ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. रुग्णालयासाठी आवश्यक एक हेक्टर ६१ आर जागा आरोग्य विभागाकडे जिल्हाधिकारी रायगड यांच्यामार्फत सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत केली आहे. या १०० खाटांचे रुग्णालय व निवासी गाळे बांधकामाचा आराखडा तयार करून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला आहे. या कामासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्याबाबत सार्वजनिक आरोग्यमंत्री यांच्याकडे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विनंती केल्यानुसार येत्या अर्थसंकल्पात या बाबतीत आवश्यक ती आर्थिक तरतूद करण्यात यावी असे, आदेश सार्वजनिक आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी दिले.

ग्रामीण रुग्णालय तळा येथील इमारतीसाठी उर्वरीत बांधकामास आवश्यक असणारा रु. १४ कोटी ९० लाख अतिरिक्त निधी व या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. त्याचप्रमाणे तळा येथील नियमित २७ पदे व बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पद्धतीवर पदे एक महिन्यात भरण्यात येतील असा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. तळा येथील ग्रामीण रुग्णालयासाठी यंत्रसामग्रीबाबत चर्चा केली असता फर्निचरची मागणी जिल्हा नियोजन मंडळाकडून प्राप्त निधीमधून पूर्ण करण्यात येईल व यंत्रसामग्रीकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री सावंत यांनी दिले.

रायगड जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या बांधकामाचा आराखडा जिल्हास्तरीय समिती १५वा वित्तीय आयोग, रायगड यांनी शिफारस करून राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या आरखडयास मान्यता देण्याबाबत महिला व बालविकास मंत्री यांनी विनंती केली असता या आराखड्यास मान्यता देण्याचे आदेश मंत्री सावंत यांनी दिले.

ट्रॉमाकेअर युनिट उपजिल्हा रुग्णालय, माणगाव सुरू करण्यासाठी शासनाने यापूर्वीच मान्यता दिली आहे. या ट्रॉमा केअर युनिट व निवासी गाळे बांधकामास प्रशासकीय मान्यता व आवश्यक तरतूद करण्याबाबत या बैठकीत मंत्री तटकरे यांनी चर्चा केली व त्यानुसार या इमारतीस प्रशासकीय मान्यता व अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करून देण्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री सावंत यांनी आश्वासन दिले. उपजिल्हा रुग्णालय माणगाव, श्रीवर्धन, तळा व म्हसळा याठिकाणी पीपीपी तत्वावर डायलेसिस युनिट उपलब्ध करून देण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

## खोपोली चोरी प्रकरणातील आरोपी ४८ तासांत गजाआड

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

नातेवाईकांकडे गेलेल्या रमेश गायकवाड यांच्या प्रकाशनगर येथील घरात ठेवलेले तीन लाख ५६ हजार २५० रुपये किमतीचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेले होते. पोलीस निरीक्षक शितल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुधाकर लहाने व पोलीस पथकाने स्वप्निल गौतम कांबळे (वय ३०, रा. मोहनवाडी खोपोली) यास मंगळवारी (दि. १२) अटक केली आहे.



रमेश गायकवाड हे लग्न समारंभाकरीता प्रकाशनगर, खोपोली येथे आले असताना फिर्यादींच्या मुलीने तिचे तीन लाख ५६ हजार २५० रू. चे सोन्याचे दागिने पर्समध्ये ठेवले होते. ते दागिने चोरट्याने लंपास केले होते. याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरिक्षक शितल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस उपनिरीक्षक सुधाकर लहाने व पथका हद्दीतील गोपनिय बातमीदार सक्रीय केले. त्याप्रमाणे मंगळवारी बातमीदारामार्फत, एक जण सोन्याचे दागिने विक्री करण्याकरीता येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिसांनी खोपोली बाजारपेठेत सापळा रचून आरोपी स्वप्नील गौतम कांबळे (वय ३०, रा. मोहनवाडी, खोपोली) यास अटक केली असून चोरीस गेलेला माल हस्तगत करण्यात आला आहे.


## जिल्हा रुग्णालयात सिकलसेल नियंत्रण सप्ताहाचा शुभारंभ

**रायगड : प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालय व जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा रुग्णालय येथे सिकलसेल आजार नियंत्रण सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. सिकलसेल आजार नियंत्रण सप्ताह ११ ते १७ डिसेंबरपर्यंत असणार आहे.

या वेळी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील, डॉ. अनिकेत म्हात्रे, डॉ. प्रियांका गायकवाड, जि. आ. अ. कार्यालयाचे श्री. वडार, आनंद घरत, डॉ. वैशाली पाटील, डॉ. मोनिसा घोडके, अधिपरिचारिका श्रीमती भोपी, सहाय्यक अधिपरिचारिका श्रीमती तारी, एमसॅक विभागाचे संजय माने आदींसह एएनएम/जीएनएमच्या विद्यार्थिनी, रुग्ण व कुटुंबिय उपस्थित होते.

डॉ. चेतना पाटील म्हणाल्या की, जिल्ह्यात सिकलसेलविषयी जनजागृती व तपासणीबाबत अधिक व्यापकरित्या कामकाज करून २०४७पर्यंत देशातून सिकलसेलचे निर्मूलन करण्याचा उद्देश पूर्ण करू या असा मानस त्यांनी या वेळी व्यक्त केला, तर सिकलसेल जिल्हा समन्वयक प्रीती पाटील यांनी सिकलसेल आजाराविषयी माहिती दिली.



समुपदेशक प्रतिम सुतार व प्रयोगशाळा तंत्रज्ञ दीपा म्हात्रे यांनी उपस्थित गर्भवती महिला व अन्य रुग्णांची सोल्युबिलिटी तपासणी करून संपूर्ण माहिती देत समुपदेशन केले. आज ७२ नागरिकांनी तपासणी केली असून या सप्ताहात जिल्हा रुग्णालयाच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनात विविध ठिकाणी तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. कार्यक्रमासाठी परिचारिका श्रीमती गावंड, ज्ञानदीप भोईर, अक्षय गोरे, साहिल म्हात्रे तसेच विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## माणगाव नेत्र शिबिरात १६० रुग्णांची तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बुधवारी (दि. १३) नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी १६० रुग्णांची तपासणी करून ७५ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

शिबिराला कोकण विशानेमा अध्यक्ष प्रदीप गांधी व मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते हेमंत शहा यांनी भेट देऊन या सामाजिक उपक्रमाबद्दल कौतुक केले.

शिबिरासाठी विजयशेठ मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक डॉ. प्रकाश पाटील, डॉ. केरवी, कीर्ती परब, अर्पिता जाधव,नेत्र महाडिक, ज्ञानेश्वर कांबळे, हिरामण पाटील यांनी सहकार्य केले.



## कर्जतमध्ये ऑनलाईन विज्ञान प्रदर्शनाचे पारितोषिक वितरण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका पंचायत समितीच्या वतीने विज्ञान प्रदर्शन ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनामधील विजेत्या स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला.

प्रदर्शनात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान, पर्यावरण अनुकूल सामुग्री, आरोग्य आणि स्वच्छता, वाहतूक आणि नवोपक्रम, पर्यावरणीय चिंता, वर्तमान नवोपक्रमासह ऐतिहासिक विकास आणि आमच्यासाठी गणित हे विषय होते. परीक्षक म्हणून सात्विक बोरसे, राजेंद्र सोनवणे, दीपक थोरात आणि सुखदा मेहेंदळे यांनी काम पाहिले.



या विज्ञान प्रदर्शनमध्ये उच्च माध्यमिक विभागात प्रथम क्रमांक मानसी प्रल्हाद शिंदे एलएईएस, दुसरा क्रमांक राजवर्धन सुनील देशमुख केईएस शाळा कर्जत, तर तिसरा क्रमांक अर्थव रवींद्र राठोड शारदा मंदिर कर्जत; आदिवासी विभागात स्वप्नील सुरेश पिरकड मधुरम चॅरिटेबल ट्रस्ट यांनी पटकावला.

माध्यमिक गटात प्रथम पूजा संतोष घरत अभिनव शाळा, दुसरा क्रमांक अथर्व संतोष भगत नेरळ विद्यामंदिर तर तिसरा क्रमांक नौतम सुरेश विश्वकर्मा केईएस शाळा कर्जत आणि आदिवासी गटात विवेक सुधाकर बुरुड पथरज आश्रम शाळा यांनी पटकावला.

माध्यमिक शिक्षक, परिचर यांच्यासाठी असलेल्या गटात प्राथमिक गटात प्रथम प्रशांत प्रभाकर दळवी तर माध्यमिक गटात प्रथम संदीप विलास गोसावी गीता इंग्लिश मिडीयम स्कूल यांना सन्मानित करण्यात आले.

## सहकारी पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांची राज्यस्तरीय बैठक

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनतर्फे जिल्हा तथा तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन पदाधिकाऱ्यांची बैठक शनिवारी (दि. १६) प्रशिक्षण व संशोधन मंदिर शिर्डी, पिंपळवाडी रोड, राहता (अहमदनगर) येथे आयोजित केली आहे, अशी माहिती फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष संचालक सुरेश पाटील व जिल्हा फेडरेशनचे उपाध्यक्ष दिलीप जोशी यांनी दिली.

बैठकीत राज्यातील पतसंस्थांची सांख्यिकीय आणि आर्थिक माहिती एकत्रित करण्यासाठी सर्व पातळीवर पतसंस्था फेडरेशनची कार्यपद्धती ठरवणे, निकोप व कर्ज वाटपासाठी पतसंस्थांना क्रॉस (सिबिल) प्रणाली अनिवार्य करणे यांसह विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे.

# ग्रामीण रस्त्यासाठी १२ कोटींचा निधी मंजूर

## आमदार गोगावलेंच्या प्रयत्नांनी हिवाळी अधिवेशनात विविध रस्त्याची कामे मंजूर

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांच्या कामासाठी आमदार भरत गोगावले यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून १२ कोटींचा रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

यामध्ये मोरेवाडी रस्ता, मांजुर्णे रस्ता, जांभूळमाळ रस्ता, साखळेवाडी रस्ता, मढेगावकोंड जोडरस्ता, गोवेले वणी अंतर्गत जोडरस्ता, सिलीम अंतर्गत जोडरस्ता, उधळेकोंड रस्ता, राष्ट्रीय महामार्ग ६६ ते कुरवडे रस्ता सुधारणा, मढेगांव नवशी रस्त्याची सुधारणा, मळ्याचीवाडी रस्ता, मांजरवणे रस्त्याची सुधारणा, भाले तळावा रस्त्याची सुधारणा, जिता उंबर्डी आदिवासीवाडी रस्त्याची सुधारणा, गोरेगांव सोन्याचीवाडी रस्त्याची सुधारणा, निगुडमाळ रस्त्याची सुधारणा, भिरा-पाटणूस रस्ता, पन्हळघर झोरेवाडी रस्त्याची सुधारणा, बोरमाच ते कुंभळमाळ रस्त्याची सुधारणा, हरकोल कोंड रस्त्याची सुधारणा, बागवाडी येथे रस्ता, भिनाड कोशिंबळे मार्ग तयार करणे, कुंभार्ते आदिवासीवाडी जोडरस्ता तयार करणे, कोशिंबळे ते निजामपूर रस्ता तयार करणे, मांडवकरवाडी जोडरस्ता तयार करणे, निजामपूर ते पाणस्पे रस्ता तयार करणे, राष्ट्रीय महामार्ग १७ ते वारक कुशेडे रस्ता सुधारणा करणे, कुंभार्ते येथे रस्ता तयार करणे, राष्ट्रीय महामार्ग १७ ते वारक कुशेडे जोडरस्ता, राष्ट्रीय महामार्ग १७ ते विघवली जोडरस्ता, आबडुंगी येथे रस्ता तयार करणे, कोस्ते बु. आदिवासीवाडी रस्ता तयार करणे, करंजेवाडी जोडरस्ता तयार करणे, कसबेवाडी जोडरस्ता तयार करणे, माणगाव कोस्ते बु. निजामपूर रस्ता तयार करणे, चिंचवली रेल्वे रस्ता सुधारणा करणे, मढेगांव नवशी रस्ता तयार करणे, मढेगांव आदिवासीकडे जाणारा रस्ता तयार करणे, वडघर मुद्रे ते रोहिदास बौद्धवाडी रस्ता तयार करणे, मढेगांव कोंड रस्ता तयार करणे, निळज ते निळज आदिवासीवाडी रस्त्याची सुधारणा करणे, सुरवतर्फे तळे हरिजनवाडी रस्ता तयार करणे, खरवली ते आदिवासीवाडी रस्ता तयार करणे, राजिवली हरिजनवस्ती रस्ता तयार करणे, बोरघर खरवली हरिजन मार्ग रस्ता तयार करणे, राष्ट्रीय महामार्ग १७ ते मुठवली कालवण दाखणे रस्त्याची सुधारणा, खर्डी बु. आदिवासीवाडी रस्त्याची सुधारणा करणे, कोशिंबळे आदिवासीवाडी रस्त्याची सुधारणा करणे, बोरवाडी मशिदवाडी रस्ता तयार करणे अशी विविध कामे समाविष्ट असून ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मंजूर करण्यात आली आहेत.

## रोहा एक्सेल कंपनीत आपत्ती निवारण प्रशिक्षण



**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक परिसरातील एक्सेल कंपनीमध्ये कंपनीचे सीनियर व्हाईस प्रेसिडेंट संजय सपाटे यांच्या संकल्पनेतून सोमवारी (दि. ११) एक दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

प्रशिक्षणासाठी सहाय्यक उपनियंत्रक नागरी संचालनालय गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्राचे एम. के. म्हात्रे हे उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये त्यांनी रासायनिक अपघातामध्ये सिव्हिल डिफेन्स युनिटने करावयाचे कार्य तसेच वेगवेगळ्या आगीचे प्रकार, अग्निशमन उपकरणे हाताळण्याची पद्धत, प्राथमिक उपचाराबद्दल, वेगवेगळ्या केमिकल्स कारट्रेज्स् तसेच रेस्पिरेटर बद्दल माहिती तसेच कॉम्प्रेस्ड एयर ब्रीदिंग पारॅटस, डोनिंग अँड डोपिंगबद्दल अद्यावत माहिती दिली. त्याचबरोबर विविध प्रात्यक्षिकेही करून दाखवले.

कंपनीचे सुरक्षा अधिकारी सुदाम करपे यांनी ट्रेनिंगचे महत्त्व उपस्थित प्रशिक्षणार्थींना समजावून सांगितले. कार्यक्रमाला उपस्थित सिनिअर मॅनेजर टेक्निकल विलास महाले यांनी, या प्रशिक्षणातून स्वतःला व समाजाला आयसीडीयू टीमचा कसा फायदा होईल याबद्दल आपले मत व्यक्त केले.

# नवी मुंबईत आज रंगणार भारत विरूद्ध इंग्लंड महिला कसोटी सामना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ट्वेंटी-२० मालिकेनतर भारतीय महिला संघ इंग्लंडविरूद्धच्या कसोटी सामन्यासाठी सज्ज झाला आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील एकमेव कसोटी सामना गुरुवार (दि. १४) पासून खेळवला जाईल. ट्वेंटी-२० मालिकेत २-१ने विजय मिळवून पाहुण्या इंग्लिश संघाने भारतीय संघाचा पराभव केला. याच पराभवाचा वचपा काढण्याचे आव्हान हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील टीम इंडियासमोर असेल.

खरे तर भारतीय संघ दिग्गज मिताली राज आणि झुलन गोस्वामी यांच्या अनुपस्थितीत प्रथमच कसोटी सामना खेळत आहे. इंग्लिश संघाने शेवटच्या वेळी जुलै महिन्यात ऑस्ट्रेलियाविरूद्ध कसोटी खेळली होती.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी सामना गुरुवारी सकाळी ९.३० वाजता सुरू होईल. भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी सामना नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर होत आहे. चाहत्यांना मोफत या सामन्याचा आनंद लुटता येणार आहे, तसेच स्पोर्ट्स १८ या चॅनेलवरूनदेखील हा सामना पाहता येईल. याशिवाय जिओ सिनेमाच्या ॲपवरही लाईव्ह प्रक्षेपण सुरू असेल.



**इंग्लंडविरूद्धच्या कसोटीसाठी भारतीय संघ : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), जेमिमा रॉड्रिग्ज, शेफाली वर्मा, दीप्ती शर्मा, यास्तिका भाटिया (यष्टीरक्षक), रिचा घोष (यष्टीरक्षक), स्नेह राणा, शुभा सतीश, हरलीन देओल, सायका इशाक, रेणुका ठाकूर, तीतस साधू, मेघना सिंग, राजेश्वरी गायकवाड, पूजा वस्त्राकर.**

**इंग्लंडचा संघ : हीदर नाइट (कर्णधार), टॅमी ब्युमॉन्ट (यष्टीरक्षक), डॅनी व्यॉट, माइया बाउचियर, ॲलिस कॅप्सी, केट क्रॉस, चार्ली डीन, सोफिया डंकले, सोफी एक्लेस्टोन, लॉरेन गिलर, कर्स्टी गॉर्डन, एमी जोन्स, बेस हीथ (यष्टीरक्षक), नॅट सायव्हर-ब्रंट, लॉरेन बेल.**

## नवी मुंबई प्रीमियर लीगच्या पाचव्या पर्वाचा शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई प्रीमियर लीग स्पर्धेचा शुभारंभ बुधवारी (दि. १३) नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष माजी आमदार संदीप नाईक यांच्या हस्ते वाशी येथे करण्यात आला.

या वेळी जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी, एनएमपीएलने खेळाच्या माध्यमातून देशामध्ये नवी मुंबईचा लौकिक वाढविला आहे, असे गौरवोद्गार काढले. या स्पर्धेमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंसोबत खेळण्याची संधी स्थानिक क्रिकेटपटूंना लाभते. वर्णभेद नको, अमली पदार्थ नको अशा प्रकारच्या सामाजिक संदेश देणाऱ्या थीम घेऊन आतापर्यंत ही स्पर्धा खेळवण्यात आली आहे. यावर्षी हेल्दी नवी मुंबई, फिट नवी मुंबई ही थीम घेण्यात आली आहे.

यावर्षी १६ मातब्बर संघांनी सहभाग नोंदवला असून २४० क्रिकेटपटूंचा दर्जेदार खेळ पहावयास मिळणार आहे. १७ ते २१ जानेवारी या कालावधीमध्ये कोपरखैरणे येथील भूमिपुत्र मैदानावर या लीगमधील खेळाचा थरार नवी मुंबईकर क्रीडा रसिकांना अनुभवता येणार आहे. या वेळी माजी नगरसेवक लीलाधर नाईक, एनएमपीएल कमिशनर दीपक पाटील, स्वप्निल नाईक, ओमकार नाईक, निलेश पाटील, प्रतीक पाटील, माजिद बलोच, महेंद्र पाटील, लक्ष्मण पाटील, सुनंदा कोळी शाबाजकर, बाबू सुतार, विकी भोईर, भूषण पाटील, समालोचक कुणाल दाते, विघ्नेश मढवी आदी उपस्थित होते.



## १९ वर्षांखालील वर्ल्डकप संघात महाराष्ट्राचे तीन खेळाडू

**मुंबई : प्रतिनिधी**

बीसीसीआयने नुकतेच १९ वर्षांखालील भारतीय संघाची घोषणा केली. हा संघ दक्षिण आफ्रिकेविरूद्धची ट्राय सिरीज आणि आयसीसी १९ वर्षांखालील वर्ल्डकपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

भारताच्या या १९ वर्षांखालील वर्ल्डकप संघात महाराष्ट्राच्या तीन खेळाडूंची निवड झाली आहे. यात सोलापूरचा अष्टपैलू खेळाडू अर्शीन कुलकर्णी आणि बीडच्या सचिन धसचा देखील समावेश आहे, तर संघाच्या नेतृत्वाची धुरा उदय सहारन याच्या खांद्यावर आहे.

या वर्ल्डकपपूर्वी भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेत तिरंगी मालिका खेळणार आहे. यात भारताशिवाय यजमान दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड या दोन संघाचा समावेश असणार आहे. उदय सहारनच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय १९ वर्षांच्या संघाचा उपकर्णधार हा कुमार पांडे आहे. याचबरोबर संघातील १५ खेळाडूंव्यतिरिक्त प्रेम देवकर, अंश गोसाई आणि मोहम्मद अमान या तीन स्टँड बाय खेळाडूंची देखील निवड करण्यात आली आहे. ते संघासोबत प्रवास करणार आहेत.

**भारतीय संघ : उदय सहारन (कर्णधार), अर्शीन कुलकर्णी, आदर्श सिंह, रुद्र पटेल, सचिन धस, प्रियांशू मोलिया, मुशीर, अवनीश राव, सौम्या पांडे, मुरुगन अभिषेक, इनेश महाजन, धनुष गौडा, राज लिंबानी, नमन तिवारी, आराध्या शुक्ला.**

## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत कुणाल पिंगळेला सुवर्ण

**खोपोली** : खोपोलीतील खेळाडू कुणाल पिंगळे यांनी एशियन पॉवरलिफ्टिंग आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ५३ किलो वजनी गटात सुवर्णपदक प्राप्त केले आहे. ही स्पर्धा बहारू (मलेशिया) या ठिकाणी सुरू आहे.

याबद्दल कुणाल पिंगळे आणि त्यांचे जिम संचालक प्रतीक लोखंडे यांचे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन अध्यक्ष गिरीश वेदक, उपाध्यक्ष श्रीनिवास भाटे, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सहसचिव सचीन भालेराव, तसेच दत्तात्रेय मोरे, माधव पंडित, संदीप पाटकर, सुभाष टेंबे, मानस कुंटे यांनी अभिनंदन केले आहे.

## एसबीसीटी विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव

**उरण : वार्ताहर**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर (एसबीसीटी) विद्यालय द्रोणागिरी यांच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाची सुरुवात सोमवारी (दि.११) झाली.

या वेळी शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत यांच्या हस्ते क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाले. कमिटी मेंबर सुनील पाटील तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. चेअरमन चंद्रकांत घरत यांच्या हस्ते तालुक्यातील इतर शाळांमध्ये विविध स्पर्धांत श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयातील विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. उद्घाटनानंतर शाळेतील प्राथमिक व उच्च प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी कवायतींचे प्रकार सादर केले.

मशाल पेटवून व शपथ घेऊन खेळांना सुरुवात करण्यात आली. मान्यवरांसमोर उद्घाटनपर खो-खो माध्यमिक विभाग मुलांचा सामना खेळवण्यात आला.



कुमार गट जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा

## अंकुर स्पोर्टस्, श्रीराम मंडळ विश्वस्त, शिवमुद्रा प्रतिष्ठान, एसएसजी फाउंडेशन उपांत्यपूर्व फेरीत



**मुंबई : प्रतिनिधी**

अंकुर स्पोर्टस्, श्रीराम मंडळ विश्वस्त, शिवमुद्रा प्रतिष्ठान, एसएसजी. फाऊंडेशन यांनी यंग भारत सेवा मंडळाने आयोजित केलेल्या कुमार गट जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली. प्रभादेवी येथील राष्ट्रीय कबड्डी खेळाडू स्व. गोपीनाथ जाधव क्रीडांगणावर दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सामन्यात अंकुर स्पोर्ट्सने विजय नवनाथ मंडळाचा पराभव केला.

पहिल्या सत्रात लोण देत २६-१७अशी आघाडी घेणाऱ्या अंकुरने दुसऱ्या सत्रात आणखी दोन लोण देत गुणांचे अर्धशतक पार केले. अमन मण्यार, साईश शिंदे यांच्या आक्रमक चढाया त्याला अनिल कोलते यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे हा विजय शक्य झाला. विजय नवनाथकडून सतीश महागावकर, सचिन लोके यांनी उत्कृष्ट प्रतिकार करीत दोन लोणची परत फेड केली, पण संघाला विजयी करण्यात ते कमी पडले.

दुसऱ्या सामन्यात शिवमुद्रा प्रतिष्ठानने ज्ञानप्रकाश मंडळाचा ४७-१० असा सहज पराभव केला. विश्रांतीला ३४-०२ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या शिवमुद्राने नंतर सावध खेळ करीत विजय साकारला. विराज लाड, विवेक चव्हाण यांच्या तुफानी खेळाला या मोठ्या विजयाचे श्रेय जाते. श्रीराम मंडळ विश्वस्तने चुरशीच्या लढतीत गुड मॉर्निंगचा कडवा प्रतिकार ३०-२३असा मोडून काढला. सलग दोन गुण घेत गुड मॉर्निंगने सुरुवात झोकात केली. पहिली १० मिनिटे गुणफलक सतत दोलायमान अवस्थेत होता. दोन वेळा तो बरोबरीत देखील झाला, पण त्यातून सावरत पहिला लोण देत श्रीरामने पूर्वार्धात १५-१२ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात आहे ती आघाडी टिकविण्यावर भर देत १० गुणांच्या फरकाने सामना आपल्या बाजूने झुकवीला.

देव शर्मा, सौरभ माळी यांच्या धूर्त चढाया त्यांना मोक्याच्या क्षणी पकडी करून विकी यादव यांनी दिलेली साथ यामुळे हा विजय शक्य झाला. गुड मॉर्निंगकडून प्रणय टेंबरकर, सिद्धेश पिसाळ, ऋषिकेश चिता यांनी उत्कृष्ट खेळ करीत शेवटच्या क्षणापर्यंत निकराचे प्रयत्न केले, पण तो त्यांच्या हातून निसटला.

















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com